सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

वर्ष - ३ रे | अंक - ६५ वा | अमरावती (महाराष्ट्र) | सोमवार दि. ३१ मार्च २०२५ | संपादक - शुभांगी जोशी | मुल्य - १ रु. | पृष्ठ -६


## दहशतवादी हाफिज सईदचा खास मित्र ईदच्या दिवशी ठार; कराचीमध्ये अज्ञाताने झाडल्या गोळ्या

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१कराची**

गेल्या काही काळापासून पाकिस्तानमध्ये लपून बसलेल्या अनेक दहशतवाद्यांचा एकामागून एक खात्मा करण्यात आला आहे. आता भारतातील मोस्ट वॉन्टेड दहशतवादी आणि २६/११ मुंबई हल्ल्याचा मास्टरमाईंड हाफिज सईदच्या जवळच्या मित्राची कराचीत हत्या करण्यात आली. लष्कर-ए-तैयबासाठी निधी जमा करणाऱ्या अब्दुल रहमानवर कराचीमध्ये अज्ञातांनी गोळीबार केला, ज्यात त्याचा मृत्यू झाला.

अब्दुल रहमान हा अहल-ए-सुन्नत वाल जमातचा स्थानिक नेता असल्याचे सांगण्यात येत आहे. तो कराचीत लष्करसाठी निधी गोळा करायचा. त्याचे एजंट



सर्व भागातून निधी आणायचे आणि त्याच्याकडे जमा करायचे, त्यानंतर तो हाफिज सईदला निधी पोहोचवत असे. गोळीबारात अब्दुल रहमानचा जागीच मृत्यू झाला, तर त्याच्या वडिलांसह तीन जण गंभीर जखमी झाले आहेत.

**क्वेट्टा येथे मुफ्ती यांची गोळ्या झाडून हत्या**

गेल्या काही वर्षांपासून पाकिस्तान दहशतवादाने त्रस्त आहे. एकीकडे बीएलए आणि तेहरीक-ए-तालिबान बलुचिस्तानमध्ये पाकिस्तानी लष्कराला टार्गेट करत आहेत. तर दुसरीकडे एकामागून एक दहशतवादी मारले जाताहेत. अलीकडेच जमियत-उलेमा-ए-इस्लामचे मुफ्ती अब्दुल बाकी नूरझाई याची क्वेट्टा येथे अज्ञात हल्लेखोरांनी गोळ्या झाडून हत्या केली होती. क्वेटा विमानतळाजवळ नूरझाई याच्यावर गोळ्या झाडण्यात आल्या.

**लष्कराचा टॉप कमांडर मारला गेला**

अब्दुल रहमानच्या आधी लष्कर-ए-तैयबाचा टॉप कमांडर झिया-उर-रहमान उर्फ नदीम उर्फ कटल सिंधी याची पंजाब प्रांतातील झेलम भागात गोळ्या घालून हत्या करण्यात आली होती. नदीम हा लष्कराचा संस्थापक हाफिज सईदचा विश्वासू सहकारी मानला जात होता. जम्मू-काश्मीरमधील पुंछ-राजौरी भागात दहशतवादी कारवायांमध्ये त्याचा सहभाग होता.

## नरेंद्र मोदी आणि संघात कोणताही दुरावा नाही : भय्याजी जोशी यांचे वक्तव्य

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३१नागपूर**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे नेते भय्याजी जोशी यांनी 'राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि पंतप्रधान मोदींमध्ये कोणताही दुरावा नसल्याचे म्हटले आहे. मोदी अनेक चांगली कामे करतात आणि पाठिंबा देतात, असा दावा देखील भय्याजी जोशी यांनी केला आहे. बोलघेवड्या भाजप नेत्यांना देखील या माध्यमातून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने चांगलीच चपराक दिली आहे. 'औरंगजेबाच्या कबरीचा विषय अनावश्यक आहे. औरंगजेबाचा मृत्यू इथे झाला, म्हणून त्याची इथे कबर आहे.



ज्याची श्रद्धा असेल तो कबरीवर जाईल, असे देखील भय्याजी जोशी यांनी म्हटले आहे.

नरेंद्र मोदी यांचे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी (आरएसएस) असलेले नाते खोलवर रुजलेले आहे. भारतीय जनता पक्ष आणि आरएसएसचे सदस्य म्हणून, मोदींची विचारसरणी आणि नेतृत्वशैली आरएसएसच्या तत्वांनी आकाराला आली आहे. अलीकडेच, नागपूर येथील आरएसएस मुख्यालयाला भेट देणारे पहिले भारतीय पंतप्रधान बनून मोदी यांनी इतिहासात नोंद केली आहे. त्यानंतर संघाचे नेते भय्याजी जोशी यांनी देखील नरेंद्र मोदी यांच्या कामाचे कौतुक केले आहे. तसेच संघ आणि मोदी यांच्यातील दुरावा वाढला असल्याच्या बातम्या केवळ मीडियामध्येच असल्याचे म्हटले आहे.

## ५०० गाड्या घेऊन पवारांच्या राष्ट्रवादीत, ९ महिन्यांपासून फरार, तुरुंगात गिते गँगकडून वाल्मिकला मारहाण?

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१बीड**

बीडमधील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येचा आणि खंडणीचा आरोप असलेल्या वाल्मिक कराड आणि सुदर्शन घुलेला मारहाण झाल्याचा दावा भाजप आमदार सुरेश धस यांनी केला आहे. बीड जिल्हा कारागृहात आज सकाळी १०.३० वाजताच्या सुमारास बबन गिते याच्या समर्थक कैदी आणि परळीतील विरोधी गटातील कैदी यांच्यात मारामारी झाली. यामध्ये वाल्मिक कराड आणि सुदर्शन घुलेला देखील मारहाण करण्यात आली, असा दावा सुरेश धस यांनी केला आहे. मकोका कायद्याअंतर्गत आरोपी असलेला वाल्मिक कराड आणि सुदर्शन घुले हे दोघे सध्या बीडच्या कारागृहात कैद आहेत.



गेल्या नऊ महिन्यांपासून बबन गिते फरार आहे. बापू आंधळे हे मरळवाडीचे सरपंच म्हणून निवडून आले होते. ते अजित पवारांच्या राष्ट्रवादीत कार्यरत होते. त्यांच्या डोक्यात गोळ्या झाडून हत्या करण्यात आली होती. सरपंच बापू आंधळे खून प्रकरणी शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे प्रदेश उपाध्यक्ष बबन गिते याच्यासह मुकुंद गिते, महादेव गिते, राजाभाऊ नेहरकर, राजेश वाघमोडे यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता. शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे नेते आणि खून प्रकरणातील आरोपी बबन गिते अद्याप समोर आलेला नाही.

## राज ठाकरे यांनी मांडलेल्या मुद्द्यांवर आम्ही निश्चितपणे विचार करू

### आम्ही सर्वांना सोबत घेऊन राज्य चालवू - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१नागपूर**

राज्य चांगलंच चालवण्याचा आमचा प्रयत्न आहे. राज्य चालवत असताना सर्वांची मदत घेऊन आणि सर्वांना विश्वासात घेण्याचा आमचा प्रयत्न आहे. मी काल राज ठाकरेंचं भाषण संपूर्ण ऐकू शकलो नाही. मात्र मी जेवढं भाषण ऐकलं त्यामध्ये त्यांनी काही महत्त्वाचे मुद्दे मांडले आहेत. या मुद्द्यांवर आम्ही निश्चितपणे विचार करू, असं म्हणत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या गुढीपाडवा मेळाव्यातील भाषणावर आपली भूमिका मांडली आहे. ते नागपूर इथं पत्रकारांशी बोलत होते.

मनसेच्या गुढीपाडवा मेळाव्यात बोलताना काल राज ठाकरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना आवाहन केलं होतं. राज्यात सध्या जुने मुद्दे उकरून काढून लोकांना भरकटवलं जात आहे. देवेंद्र फडणवीस यांना मोठ्या बहुमताने या सुसंस्कृत राज्याची सत्ता मिळाली आहे. त्यांनी राज्य चांगलं चालवावं. आम्हाला विश्वासात घेऊन राज्य चालवल्यास आमचा त्यांना पाठिंबा असेल, अशी भूमिका त्यांनी मांडली होती. राज यांच्या या आवाहनाला प्रतिसाद देत आम्ही सर्वांना सोबत घेऊन राज्य चालवू, अशा शब्दांत मुख्यमंत्र्यांनी त्यांना आश्वस्त केलं आहे.

**मोदींचा उत्तराधिकारी कोण?**

देवेंद्र फडणवीस हे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे उत्तराधिकारी असतील, अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे. याबाबत पत्रकारांनी प्रश्न विचारल्यानंतर आपण या स्पर्धेत नसल्याचं मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केलं आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा उत्तराधिकारी शोधण्याचं कोणतंही कारण नाही. आम्ही त्यांच्याच नेतृत्वात लढणार आहोत. २०२९मध्येही आम्ही पंतप्रधान म्हणून त्यांच्याकडेच बघतो आहोत. त्यामुळे आता अशी चर्चा करणं योग्य नाही. भारतीय संस्कृतीत वडील जिवंत असताना मुलांचा विचार केला जात नाही, करायचाही नसतो. असा विचार करणं ही मुघली संस्कृती आहे. त्यामुळे मोदींचा उत्तराधिकारी निवडण्याची अजून वेळ आलेली नाही आणि जोपर्यंत माझा विषय आहे, माझा याच्याशी काही संबंधही नाही, असं देवेंद्र फडणवीस म्हणाले.

राज ठाकरे यांनी काल



धार्मिक स्थळांवरील अनधिकृत भोंग्यांचाही मुद्दा उपस्थित केला होता. मशिदीवरील भोंग्यांच्या आंदोलनानंतर मनसे कार्यकर्त्यांवर गुन्हे दाखल केले गेले. उत्तर प्रदेश सरकारने भोंगे हटवण्याचा निर्णय घेतला, पण महाराष्ट्रात अजूनही भोंगे आहेत, अशा शब्दांत राज ठाकरेंनी नाराजी व्यक्त केली होती.

त्यावर बोलताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, नियमांच्या बाहेर जे भोंगे आहेत त्यांच्यावर १०० टक्के कारवाई केली जाईल आणि सुप्रीम कोर्टाच्या निर्देशांचं तंतोतंत पालन महाराष्ट्र सरकारकडून केलं जाईल.

एएसआयची प्रोटेक्टेड कबर आहे. आम्हाला औरंगजेब आवडो ना आवडो, पण कायद्याने त्या कबरीला ५०-६० वर्षांपासून संरक्षण देण्यात आलेलं आहे. त्यामुळे आम्ही त्या कबरीचं संरक्षण करत आहोत. पण कोणत्याही परिस्थितीत महाराष्ट्रात औरंगजेबाच्या कबरीचं उदात्तीकरण होऊ देणार नाही, असं मतही मुख्यमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केलं आहे.

## पाणी ठरतंय जीवघेणं! पाणी पिताच होतेय किडनी फेल, ६० गावात भीतीचे वातावरण

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१अकोला**

खार पाणी प्यायलं तर किडनी फेल होते हे सर्वांना माहिती आहे. राज्यभरात अनेक नागरिक किडनीच्या आजाराने त्रस्त आहेत. अकोल्यात असाच काहीसा प्रकार पाहायला मिळाला आहे. अकोल्यातल्या बाळापूर मतदारसंघात अंतर्गत ६० पेक्षा अधिक गावात खारं पाणी प्यायल्यामुळे अनेकांना किडनीचे आजार झाले आहेत. इतकंच नाही तर अनेकांच्या किडनी फेल झाल्या आहेत. एक नव्हे तर दोन्ही किडनी फेल झाल्या आहेत. तब्बल शेकडो जणांना खारं पाणी प्यायलाने किडनीच्या संबंधित





आजार झाले आहेत.

अकोला जिल्ह्यातील बाळापूर तालुक्यातल्या सावरपाटी गावातील नागरिकांमध्ये सध्या किडनीच्या आजारामुळे भीतीचे वातावरण आहे. विहिरी आणि बोअरमधलं क्षारयुक्त पाणी इथले गावकरी पित आहेत. यामुळे किडनी स्टोन आणि किडनी संबंधीचे आजार गावकऱ्यांना होत आहेत. तर अनेकांना किडनी फेल झाल्यामुळे मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे.

सावरपाटी गावात तीन ते चार जणांना क्षारयुक्त पाण्यामुळे किडनीचे आजार झाले. तर एकाला आपली किडनी गमवावी लागलीय. प्रशांत काळे या व्यक्तीची किडनी पूर्णतः फेल झाली. त्यांना उपचारासाठी १२ लाखांवर खर्च आला. यासाठी त्यांनी शेती विकली खरी मात्र तरीही फायदा झाला नसल्याचे त्यांनी सांगितले.बाळापूर तालुक्यातल्या जवळपास ६० पेक्षा अधिक गावात हिच परिस्थिती आहे. पारस ते निंबा फाटापर्यंत असलेल्या सर्व गावी हे खारपणपट्ट्यात वळतायेत. दुसरीकडे घरोघरी नळ असले तरी पाण्याच्या टाकीत चढणारं पाणी हे गावातील विहिरी आणि बोअरवेल मधीलच आहे. इथलं पूर्णतः क्षारयुक्त पाणी असल्यानं अनेकांना विविध आजाराला समोरे जावे लागतं आहे. याच्या बचावासाठी गावकरी १५ ते २० किमी अंतराराहून गोड पाणी दुचाकीवर पिण्यासाठी आणत आहेत. तर काहींना गोड पाण्यासाठी पैसे मोजावे लागत आहेत.

## स्विट डिझायर ची दुचाकीला धडक ; एक ठार एक गंभीर जखमी

### उसळगव्हाण गावाजवळ नागपुर औरंगाबाद एक्सप्रेस हायवेवर अपघात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. ३१ धामणगाव रेल्वे**

तालूक्यातील तळेगांव दशासर पोलीस ठाण्याच्या हद्दीत नागपूर औरंगाबाद एक्सप्रेस हायवेवर उसळगव्हाण गावानजिक स्विफ्ट डिझायरने विरुद्ध दिशेने येणाऱ्या दुचाकीला धडक दिल्याने झालेल्या अपघातात दुचाकी स्वार जागीच ठार तर उर्वरीत एक जण गंभीर जखमी झाला आहे. हा अपघात सोमवार ला ( ता. ३१) सकाळी ११ वाजताच्या सुमारास झाला.

मिळालेल्या माहीतीनुसार असे की यवतमाळ जिल्ह्यातील सौजना येथील पंकज महादेव गिरी (५०) व रमेश उत्तम रोकडे ( ५०)



हे दोघे जण सावंगा विठोबा येथील यात्रेत गेले होते. परत येतांना उसळगव्हाण येथे आपल्या नातेवाईकाकडे काही काळ थांबून सौजना या आपल्या गावाकडे दुचाकी क्र. एम.एच३२-एफ४६६१ ने परत जात असतांना उसळगव्हाण गावानजिक मॉ वैष्णवी ग्वालीयर ढाब्याजवळ पुलगाव कडून येणाऱ्या एम.एच०६-एडब्लू८०७५ या स्विफ्ट डिझायर गाडीने धडक दिली यात पंकज महादेव गिरी (५०) व रमेश उत्तम रोकडे ( ५०) हे दोघे जण गंभीर जखमी झाले. प्रथम जखमींना पुलगांव येथे ग्रामीण रुग्णालयात भरती करण्यात आले. येथे पंकज महादेव गिरी याला डॉक्टरांनी मृत घोषित केले. तर गंभीर जखमी असलेल्या रमेश रोकडे यास अधिक उपचारार्थ सेवाग्राम येथील रुग्णालयात रवाना करण्यात आले. सदर प्रकरणी अधिक तपास तळेगांव दशासर पोलीस करीत आहेत.

## पंतप्रधान मोदींच्या खासगी सचिवपदी आयएफएस अधिकारी निधी तिवारी यांची नियुक्ती

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१नवी दिल्ली**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या खासगी सचिवपदी (प्रायव्हेट सेक्रेटरी) निधी तिवारी यांची निवड करण्यात आली आहे. केंद्र सरकारने ही नियुक्ती केली असून याबाबतचे निवेदनही जारी केले आहे.



निधी तिवारी या नोव्हेंबर २०२२ पासून पंतप्रधान कार्यालयात (झचज) उपसचिव म्हणून कार्यरत आहेत. त्याआधी त्या परराष्ट्र मंत्रालयाच्या निरस्त्रीकरण आणि आंतरराष्ट्रीय सुरक्षा व्यवहार विभागात अवर सचिव होत्या.केंद्र सरकारने शनिवारी प्रसिद्ध केलेल्या निवेदनात म्हटले आहे की, निधी तिवारी या २०१४ बॅचच्या भारतीय परराष्ट्र सेवा अधिकारी आहेत. त्या प्रामुख्याने परराष्ट्र व्यवहार, अणुऊर्जा आणि सुरक्षा व्यवहार यासह राजस्थान राज्याशी संबंधित कामकाज पाहत होत्या.कार्मिक व प्रशिक्षण विभागाने २९ मार्च रोजी जारी केलेल्या निवेदनानुसार, मंत्रिमंडळाच्या नियुक्ती समितीने त्यांची नियुक्ती तात्काळ प्रभावाने मंजूर केली आहे.दरम्यान, आतापर्यंत विवेक कुमार आणि हार्दिक सतीशचंद्र शहा हे दोन अधिकारी पंतप्रधान नरेंद्र मोदींचे खासगी सचिव म्हणून काम पाहत होते.

## यंदा पडणार सरासरीपेक्षा कमी पाऊस.... कर्जतमध्ये सद्गुरू गोदड महाराजांच्या संवत्सरीमध्ये वर्तविले भाकीत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१कर्जत**

यावर्षी सरासरीपेक्षा कमी पाऊस पडेल. वादळ,भूकंप व आगीच्या मोठ्या घटना घडतील, असे भाकीत सद्गुरू गोदड महाराजांच्या हस्तलिखितात वर्तविण्यात आले आहे.

कर्जत येथे संत सद्गुरू गोदड महाराजांनी संजीवन समाधी घेतली. मात्र, तत्पूर्वी त्यांनी अनेक ग्रंथ संहिता यासह विविध प्रकारचे लिखाण केले आहे. प्रत्येक वर्षी गुढीपाडव्याच्या दिवशी भाकीत किंवा भविष्य वाचण्याची शेकडो वर्षांची परंपरा आहे. साठ वर्षांची ही संवत्सरी त्यांनी देश व जागतिक पातळीवरील घटनांबाबत लिहून ठेवला आहे. त्याला श्री सद्गुरू गोदड महाराज फळ.. असे म्हणतात. शालिवाहन शके १९४७ मध्येय गोदडमहाराजानी हे लिखाण केले आहे. प्रत्येक वर्षीच भाकीत हे चैत्र पाडव्याच्या दिवशी वाचण्यात येते.

यावर्षी पाऊस कसा असेल, कोणती पिके चांगली राहतील, नैसर्गिक संकटे येतील का,



राजकीय घडामोडी काय आहेत, या सर्व बाबींचा उल्लेख यामध्ये आढळून येतो. प्रथेप्रमाणे मानकर यांना वाजत-गाजत मंदिरामध्ये आणण्यात आले. त्यानंतर संत गोदड महाराजांच्या नावाचा गजर करून मंदिराचे पुजारी पंढरी महाराज काकडे व अनिल महाराज काकडे यानी संवत्सरीचे यावर्षीचे भाकिताचे वाचन केले.यावर्षीच्या संवत्सरीचे नाव विश्वा वसूनाम संवत्सर असे आहे. याचा स्वामी रवी आहे. यावर्षी मोठमोठी वादळे होतील, जोरदार वारा सुटेल, सरासरी पाऊस कमी पडेल, प्रचंड उष्णता, यामुळे आगीच्या घटना घडतील, भूकंप होतील, तर देशातील काही भागांमध्ये गारपीट होईल.

पाऊस सर्वत्र सारखा पडणार नसल्यामुळे ज्या भागांमध्ये कमी पाऊस होईल, त्या ठिकाणी अन्नधान्याची टचाई निर्माण होईल. त्यामुळे अन्नधान्याचा संचय करावा, असे भाकीत सांगण्यात आले आहे.

खरीप पिकानंतर रब्बी पिकाला देखील यावर्षी कमी पावसामुळे अडचण निर्माण होईल. यावर्षी मागील वर्षाच्या तुलनेत आणखी उष्णता वाढेल. या उष्णतेची तीव्रता एवढी असेल की अनेक ठिकाणी आगी लागण्याच्या घटना घडतील. चारा जनावरांना कमी होईल. यामुळे नुकसान होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. असे असताना काही भागांमध्ये मात्र मोठ्या प्रमाणामध्ये गारपीटी, वादळी वाऱ्यासह जोरदार पाऊस पडून त्याची देखील संकट निर्माण होईल. आषाढ व श्रावण महिन्यांत कमी पाऊस पडणार आहे.

## जेल के अंदर मारना, या मरना' वाल्मिक कराड मारहाणीनंतर आरोपीची फेसबुक पोस्ट

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१बीड**

बीडमधील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणातील आरोपी वाल्मिक कराड आणि सुदर्शन घुले यांना तुरुंगात मारहाण करण्यात आली आहे. याबाबत भाजप आमदार सुरेश धस यांनी माहिती दिल्यावर खळबळ उडली. महादेव गिते आणि अक्षय आठवले यांनी ही मारहाण केल्याचा दावा आमदार सुरेश धस यांनी केला. या मारहाण प्रकरणात बबन गित्ते याचे कनेक्शन समोर आले आहे. बापू आंधळे खून प्रकरणातील आरोपी असलेला बबन गित्ते गेल्या ९ महिन्यांपासून फरार आहे. मारहाणीच्या प्रकरणानंतर बबन गित्ते त्याने फेसबुकवर पोस्ट टाकली आहे. बबन गित्ते याच्या या पोस्टनंतर बीडमध्ये टोळीयुद्ध भडकण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. दरम्यान, तुरुंग प्रशासनाने वाल्मिक कराड आणि सुदर्शन घुले यांना मारहाण झाल्याचे वृत्त फेटाळले आहे.

वाल्मीक कराडवर झालेल्या हल्ल्यानंतर शशिकांत ऊर्फ बबन गीते याच्या पोस्टमधून वाल्मिक कराड याला इशारा दिला आहे. त्यात त्याने म्हटले आहे की, 'अंदर मारना या मरना सबकुछ माफ है'

## संपादकीय ......

# सत्य जगतधर्म 'इस्लाम'

इस्लामला 'दिन ए फितरत' अर्थात प्राकृतिक धर्म म्हटले जाते. याचे कारण म्हणजे, निसर्ग नियम, प्रकृती आणि मानवी प्रवृत्ती यांची योग्य सांगड व संतुलन यामध्ये साधलेले आहे. इतर सजीव व प्राणिमात्रांप्रमाणे मानवही समूहाने राहणारा व सहजीवनाचा आनंद घेणारा प्राणी आहे; परंतु सृष्टी व जीवनाचे विशेष औदार्य मनुष्यमात्रास लाभलेले आहे. त्यामुळे मानवास पृथ्वीतलावरील 'खलिफा' अर्थात नेता किंवा प्रतिनिधी म्हटले जाते. आज रमजान ईदच्या निमित्ताने..!

इतर प्राणिमात्रांप्रमाणे निसर्गाच्या एका ठरावीक चाकोरीबद्ध जीवनात न अडकता मानवाने बुद्धी, विचार आणि विवेकाच्या जोरावर मानवी संस्कृतीचा पाया घातला. ज्ञान, विज्ञान आणि कल्पकतेने विश्वातील सत्यांचा शोध घ्यायचा प्रयत्न केला. ही मानवजातीच्या नवोन्मेष व नवनिर्माणाची उर्मी आहे. निसर्गानेही त्याला भरपूर साधन, सुविधा व संसाधने बहाल केली आहेत; पण मानवी जीवनाच्या गरजा भागवण्यासाठी मनुष्याने याचा योग्य व पर्यावरण संतुलित वापर करणे गरजेचे आहे. नैसर्गिक पर्यावरण जपा, जे तुमच्या भावी पिढ्यांचे जीवन आहे. आपण लावलेले एक झाड पुढच्या पिढ्यांना फळे देत राहील, जे एक धर्मादायी काम आहे. ज्यातून एक पर्यावरणपूरक मानवी संस्कृतीचा विकास होईल. इस्लामने अशा मानवी प्रवृत्ती व प्रकृतीचे योग्य संतुलन राखणार्या संस्कृतीची भलावण केली आहे. ज्यामध्ये एकच एक विश्वात्मक परमेश्वराचे सत्य, नैसर्गिक न्याय आणि नैतिकतेचा प्राकृतिक 'सत्य जगत धर्म' उजागर केलेला आहे. जो सर्वच मानवजातीसाठी आहे आणि सत्य संकल्प, सत्कर्म, सदाचार व सद्व्यवहाराने अखिल मानवजातीचे कल्याण साधणारा सन्मार्ग आहे. सन्मान, शांती, सुरक्षितता व विकासाचा हा सन्मार्ग एक कठोर कर्तव्य म्हणून आचरणात आणावा.

आज नैसर्गिक पर्यावरण संतुलनासोबतच मानवी जीवनाचे योग्य संतुलन व क्रियाकलाप जरुरीचे आहे. माणसाचा स्वार्थ, हव्यास व ओरबाडण्याची प्रवृत्ती टोकाला गेलेली आहे. कुराण म्हणते, संपत्तीचा हव्यास तुम्हाला गफलतीत चूर करून टाकतो. (कु. १०२:१). समाजजीवन अतिशय गढूळ झालेले आहे. दुसर्याचे दुःख व वेदना जाणण्याची माणसाची वृत्ती व संवेदना संपुष्टात आलेली आहे. विद्वेष, उन्माद, हुल्लडबाजी, दमन, वर्चस्व, सत्ता, हिंसाचार जो माणसाचा विखार, विकृती व अपप्रवृत्ती आहे, तो वाढीस लागलेला आहे. त्यासाठी तो कोणत्याही थराला जायला मागे पुढे पाहत नाही. संपूर्ण देशात व राज्यात अराजक माजलेले आहे, हे खेदाने म्हणावे लागते. पृथ्वीतलावर दांडगाई व अराजक माजवणार्यांची इस्लाम व कुराणने घोर निंदा व धिक्कार केलेला आहे. याबाबत कुराण म्हणते, धरित्रीवर फार ऐटून घमेंडीत चालू नकोस, तू जमीन तर फाडू शकणार नाहीस व पर्वताच्या उंचीस तर पोहोचणार नाहीस. (कु. १७:३७). मुलुखात फिसाद वा अराजक फैलावत फिरू नका. (कु. २६:१८३). परमेश्वर कोणाही ऐटबाज व शेखीखोरास पसंत करीत नसतो. आपल्या चालण्यात व वागण्यात मध्यमपणा राखा व नम्र-पणाने हळूहळू बोला. (कु. ३१:१८-१९). जे लोकांवर जुलूम करतात व मुलुखात हकनाक दांडगाई माजवितात, त्यांना परमेश्वर पसंत करीत नसतो. (कु. ४२:४०-४१). जो कोणी चुकीच्या मार्गात आहे, परमेश्वर त्यांना ढीलच ढील दिल्यासारखे करतो आणि जे लोक सन्मार्गावर आहेत. परमेश्वर त्यांना अधिकाधिक सन्मार्गाची बुद्धी देतो. (कु. १९:७५-७६). ज्या ज्या गोष्टी वाईट आहेत, त्या सर्व परमेश्वर नापसंत करतो. (कु. १७:३८). यात तर शंकाच नाही की, जुलमी लोक कोणत्याही प्रकारे सफल व्हायचे नाहीत. (कु. ६:१३६). एक दिवस त्यांच्या पापाचा घडा नक्की भरेल. मोहरीच्या दाण्याइतके जरी कर्म असेल अर्थात कोणत्याही परिस्थितीतील कोणतेही कर्म, त्याचा हिशेब नक्की होईल. (कु. ३१:१६, २१:४७). आम्ही सत्य ते असत्याच्या डोक्यावर मारतो आणि असत्याचे मस्तक ठेचून टाकतो. (कु. २१:१८). त्यामुळे न्यायाने वागा. न्यायावर दृढ राहा. अन्यायाचे प्रवर्तक होऊ नका. अन्यायाचा प्रतिकार करा. निःसंशय न्याय व नीतिमत्ता मोठ्या पायरीची होय. परमेश्वराच्या मार्गात दुर्बल पुरुष, स्त्रिया व मुलांसाठी लढत राहा. कमजोर, पीडितांची पाठराखण करा. द्वेष, उन्माद, हुल्लडबाजी, दमन, वर्चस्व, सत्ता, हिंसाचार म्हणजे धर्म नव्हे. प्रेम, दया, सेवाभाव, बंधुता, सौहार्द, शांती, सहजीवन व मानवता हाच खरा धर्म होय. रमजानचे 'रोजे' तुम्हाला आत्मसंयमनाबरोबरच शारीरिक, मानसिक, नैतिक व अध्यात्मिक बळ देते, जे स्वतःमधील व समाजातील वाईट गोष्टींच्या विरोधात लढण्याचे बळ देते.

# टोमॅटोसाठी ठिबक सिंचनाच्या वापर करा, ४५ टक्के पाणी बचत करा

**दि.३१विदर्भ प्रजासत्ताक**

उन्हाळी टोमॅटो पिकासाठी ठिबक सिंचनाचा (ढारीं ऋगी-ळपस) वापर केला असता ४५ टक्क्यांपर्यंत पाणी बचत व १५ ते २५ टक्के उत्पादनात वाढ मिळते. टोमॅटो पिकासाठी (ऊेळ खीीळ-सरींळेप) ठिबक सिंचन संच वापरावयाचा असल्यास, पिकाच्या लागवड पद्धतीमध्ये थोडासा बदल करणे आवश्यक आहे.

**उन्हाळ टोमॅटो ठिबक सिंचन**

सर्वसाधारणपणे सलग लागवड करण्यापेक्षा जोड ओळ पद्धतीचा वापर केला असता आंतरमशागत, तोडणी, फवारणी इत्यादी कामे सुलभतेने करता येतात. महत्त्वाचे म्हणजे ठिबक सिंचन संचाच्या खर्चात ३० टक्के बचत होते. हंगामानुसार जमिनीची पूर्वमशागत झाल्यानंतर टोमॅटोसाठी ठिबक सिंचनासाठी शेताचे सर्वेक्षण करून आराखडा तयार करावा. त्यानंतर आराखड्यानुसार ठिबक सिंचन संचाची मांडणी करावी. उच्चतम गुणवत्तेच्या संचाची निवड करावी. संकरित टोमॅटोसारख्या जवळच्या अंतराच्या पिकासाठी इनलाईन ठिबक सिंचन पद्धतीचा अवलंब करावा. इनलाईन उपनळ्या (लॅटरल) १२ मिमी, १६ मिमी. व्यासामध्ये उपलब्ध आहेत. टोमॅटोसाठी दोन इनलाईन नळ्यांमधील अंतर १८० ते २२५ सें.मी. ठेवावे. त्यासाठी शक्यतो जमिनीच्या प्रकारानुसार ६०-१०० सें.मी. किंवा ७५-१५० सें.मी. जोड ओळ (टोमॅटोच्या दोन ओळींमध्ये ६० सें.मी./ ७५ सें.मी. अंतर व दोन जोड ओळींमध्ये १२०/ १५० सें.मी. चा पट्टा) पद्धतीने लागवड करावी. ड्रीपरचा प्रवाह ४ लिटर प्रति तास व ड्रीपर्समध्ये अंतर जमिनीच्या प्रकारानुसार ३० ते ६० सें.मी. असलेल्या इनलाईन नळीची निवड करावी.


– ग्रामीण कृषी मौसम सेवा आणि विभागीय संशोधन केंद्र, इगतपुरी.

विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष













## लॅक्टोज इनटॉलरन्समुळे जाणून घ्या होणाऱ्या समस्या आणि त्यावरील उपाय

**दि.३१विदर्भ प्रजासत्ताक**

दुधात लॅक्टोज नावाची साखर असते. लॅक्टोज इनटॉलरन्स हा आजार नसला, तरी तो तुम्हाला त्रास देऊ शकतो. आपल्या शरीरात 'लॅक्टेज' हे एन्झाईम असते जे शरीराला साखर शोषण्यास मदत करते.



हे एन्झाईम लहान आतड्यात असते. काही लोकांमध्ये ते नसते किंवा फारच कमी असते. ज्यांच्याकडे लॅक्टोज कमी आहे त्यांना दुग्धजन्य पदार्थ, अगदी दुधापासून बनवलेली स्वादिष्ट देशी मिठाईही पचवता येत नाही. ज्यांच्यामध्ये लॅक्टोजची कमतरता असते, त्यांच्या लहान आतड्यात दुधातली साखर, लॅक्टोजचे विघटन होऊ शकत नाही.हे कोलनमध्ये जाऊन तेथील जीवाणूंमध्ये मिसळते आणि किण्वन होते, ज्यामुळे गॅस, ढेकर, जुलाब आणि उलट्या किंवा मळमळल्यासारखे वाटू लागते. लॅक्टोज इनटॉलरन्स कोणालाही होऊ शकतो. जगभरातील लाखो लोकांना विशेषतः प्रौढांना हा त्रास असतो.

यात आश्चर्य वाटण्यासारखे काहीच नाही की, सुमारे ४० टक्के लोकांमध्ये २ ते ५ वर्षांनंतर लॅक्टोज एन्झाईमचे उत्पादन थांबते किंवा मोठ्या प्रमाणात कमी होते. लॅक्टोज इनटॉलरन्सचा त्रास होत असल्यास दुग्धजन्य पदार्थांच्या सेवनानंतर अतिसार, मळमळ, उलट्या, पोटदुखी किंवा लचक भरणे, गॅस आणि ढेकर येणे अशी लक्षण दिसतात.

काही आठवडे दुग्धजन्य पदार्थ खाणे बंद केल्यास ही बाब सहज लक्षात येते. या व्यतिरिक्त हायड्रोजन ब्रेथ टेस्टसारखी चाचणीही करू शकता. यामध्ये तुम्हाला असे पेय पिण्यास सांगितले जाईल, ज्यामध्ये लॅक्टोजचे जास्त प्रमाणात असेल. काही काळानंतर तुमच्या श्वासातील हायड्रोजनचे प्रमाण मोजले जाईल. तुमच्या श्वासोच्छ्वासात हायड्रोजनचे प्रमाण जास्त असेल, तर याचा अर्थ तुम्हाला लॅक्टोज इनटॉलरन्स आहे.

# वैखरी

**प्रेम म्हणजे नसते वासना प्रेम तर आहे एक साधना**
**प्रेम म्हणजे एक उपासना प्रेम म्हणजे त्याग भावना**

या सुंदर ओळींना समर्पक अशी कादंबरी म्हणजे वैखरी आहे.ऋग्वेदात सांगितल्याप्रमाणे वाणीरूपी भाषेचे चार टप्पे असतात. त्यातील पहिले तीन टप्पे स्वतः ला जाणवत असले तरी दुसर्यांना सांगता येत नाही. चौथा टप्पा मात्र शब्द रूपाने बोलून किंवा लिहून दाखवू शकतो. हा टप्पा म्हणजे वैखरी.वसंतच्या लेखणीतून आकाराला आलेली वैखरी ह्या अर्थानेही कादंबरीचे शीर्षक चपखल ठरते.

मनोगत व्यक्त करतांना कादंबरीकार लिहीतात,

मी प्रेम करतो तुझ्यावरम्हणून तुही माझ्यावर करावेमाझी होत नसशील तरतू कुणाचीही न व्हावे .

या विकृत मानसिकतेतून एकतर्फी प्रेमाच्या बळी ठरणार्या तरुणींच्या संख्येत भर पडतांना पाहून मन अस्वस्थ होतं. मनात प्रश्नांचं काहूर माजतं. प्रेम ही एक पवित्र उदांत व सुखावह भावना असतांना प्रेमाचा पाझर ज्या हृदयात फुटलेला असतो तो युवक अशी विघातक कृती कशी करू शकतो? हा प्रश्न मनाला पडतो. त्या प्रश्नाचे उत्तर शोधतांना असं जाणवतं की त्या युवकाचा विवेक जागृत नसतो. प्रेम म्हणजे घेणं नव्हे, ओरबाडणं नव्हे तर प्रेम म्हणजे आपण ज्या व्यक्तीवर प्रेम करतो त्या व्यक्तीच्या सुखासाठी धडपडणे.(पृ.१०) अशी प्रेमाची व्याख्या मनोगतातकादंबरीकार सांगतात. ती मनाला पूर्णपणे पटते.

काय गं नाव काय तुझं ?बघताच तुला मन हरवलं माझं.

या दोनोळीने कादंबरीची लक्षवेधी सुरूवात होते. एकतर्फी प्रेम करणारे दोन जीव एकमेकांशी स्वप्नात प्रेम करतात. प्रत्यक्षात मात्र कोणत्याही प्रसंगी प्रत्यक्ष सांगत नाही. मनावरचा ताबा हेच सर्वश्रेष्ठ आयुष्य हा संदेश या कादंबरीतून सहज मिळतो. ओघवती भाषा, सुत्रबध्दता, प्रसंगानुरूप संवाद, वातावरण निर्मिती, पात्र, प्रत्यक्ष डोळ्यासमोर सिनेमा उभा करण्याचे बलस्थान अशी दर्जेदार साहित्यकृती वाचल्याचे समाधान कादंबरीत वाचकांना निश्चितच वाचताना मिळते .




वसंत, सुहित, स्वरा, आत्या, आई, काकू, पाटील घराणे, वादविवाद, प्रेम, आत्याचा भूतकाळ, अनाथाश्रम, वसंताचे प्रेम, वैखरीच्या चपळ, हुशार, वृत्तीचे नियोजन, वैखरीची सुंदर, नात्याची गुंफण, वैखरीचे प्रसंगानुरूप वागणे बोलणे ही गुणविशेषता या कादंबरीत आढळते.कादंबरीमध्ये पेरलेल्या चारोळ्या, दोनोळ्या आणि मनाला भावणारी गाणी यामुळे उच्च दर्जाचे मनोरंजन करण्यात लेखिकेची लेखणी यशस्वी झालेली आहे . प्रेमाचा खरा अर्थ कादंबरी तून लक्षात येतो. युवा वर्गासाठी कादंबरी उत्तम मार्गदर्शक ठरेल यात शंका नाही.

प्रेम व्यक्त करण्यासाठी वेळ काळ परिस्थितीचे भान असावे लागते हे सत्य हळूहळू पात्रांच्या संवादातून उलगडत जाते.सुहित आणि वसंत चे बोलणे जीवाभावाचे दोन मित्रांसारखे नसून सख्खे भाऊ असल्यासारखे वाटते. वैखरीने गिटार वर गायलेले हिंदी गीत वसंताचे मन जिंकून घेते.कुछ इस तरह तेरी पलकेमेरी पालकों से मिला देआंसू तेरे सारे मेरीपलकों मे सजा दे

वसंत देखील स्वप्नात तिच्यासोबत बोलतो, गाणी गातो. जीवनाचं तत्त्वज्ञान वैखरी उलगडत जाते. आत्याचा भूतकाळ ऐकून व्यथित होते.

सुखामागून दुःख, दुःखामागून सुखपाठशिवणीचा खेळ आयुष्यभराचा!खेळात प्रश्नच उरत नाही हारजीतचा,प्रत्येकावर डाव येतो सुख तसेच दुःखाचा!(पृ.९९)

वैखरीचा समजूतदार पणा आणि वसंताच्या मनाचा पारदर्शक विचार वाचकांच्या मनावर अधिराज्य गाजवतो.प्रेमामुळे निराश झालेले मन प्रेमाने जोडता येते. आणि विशेष म्हणजे इतर नात्यांना देखील या कादंबरीत महत्त्वाचे स्थान दिलेले आहे. आईवडीलांच्या इच्छेप्रमाणे वैखरी वागते. त्यानुसार बोलते. विशेष म्हणजे वसंत देखील स्वतःचे प्रेम व्यक्त करत नाही. वैखरी योग्य प्रसंगी योग्य संवाद साधते. आणि अनेकांचे मन जुळवण्यासाठी प्रयत्न करण्याचे कसब कादंबरीला यशस्वी ठरविते.चेहर्यातील साम्य हे देखील विशेष बलस्थान आहे.

बदलतो तो माणसाचा दृष्टीकोन,माणसं कधी बदलत नसतात!माणसाचे विचार बदलले की,माणसांच्या कृती बदलत असतात!(पृ.१०३) यासारखे उच्च कोटीचे विचार ही कादंबरी वाचकाच्या मनात पेरत जाते .

गायत्री पेडणेकर लेखिका, (संपादिका मॉम्सप्रेसो ब्लॉगिंग मुंबई) नामदेव पाटील कोल्हापूर, प्रवीण गावंडे, डॉ. मुक्ता बोरकर भंडारा, सौ. शिल्पा सुतार बंगलोर, डॉ. रश्मी अग्रवाल सोलापूर, सौ. वैशाली देवरे नाशिक, प्रफुल्ल कचवे शिक्षणाधिकारी अमरावती, संजना इंगळे यांचे अभिप्राय पुस्तकात घेतले आहेत.

आदरणीय सुप्रसिद्ध समिक्षक कविवर्य द .गो काळे सरांची पाठराखण अतिशय अभ्यासपूर्ण आणि कादंबरीचा सारांश मांडणारी आहे.

एक उत्कृष्ट कादंबरी वाचल्याचे समाधान वाचकाला मिळते. प्रेम हे न व्यक्त करता देखील माणूस जगू शकतो. युवा वर्गासाठी उत्तम असे मार्गदर्शक ठरणारी वैखरी ही कादंबरी आहे. वाचक वर्गावर अधिराज्य गाजविणारी कादंबरी म्हणजे वैखरी अशा सुंदर कादंबरीचा समावेश महाविद्यालयीन अभ्यासक्रमात असायला हवा असे सहज मनापासून वाटते .ही कादंबरी महाविद्यालयीन विद्यार्थांना प्रेमाचा खरा अर्थ पटवून देऊन त्यांचा विवेक जागृत करण्यात योग्य मार्गदर्शक करून युवक युवतींचे भविष्य सुरक्षित करण्यात निश्चितच मैलाचा दगड ठरेल. वैखरी कादंबरी मला नैतिक संस्कार करणारे विद्यापिठ वाटली.

**लेखिका**
**ॲड. डॉ.नीता प्रफुल्ल कचवे**

# रिपोट वापस ले नही तो चेहरे पे तेजाब फेंककर काट डालेंगे

## पुरुषोत्तम हरवाणीसह दोघांवर गुन्हा दाखल

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३१अमरावती–** रिपोट वापस ले नही तो तेरे चेहरे पे तेजाब फेककर काट डालेंगे, अशी धमकी महिलेला दिली. या प्रकरणात गाडगेनगर पोलिसांनी महिलेच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल केला.

पुरुषोत्तम हरवाणी (वय ६०), आदर्श हरवाणी आणि विरभान झांबानी (वय ५०) अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत.

पीडिता शनिवारी चांगापूर येथे दर्शन करण्याकरिता गेली होती. परत ती दुचाकीने येत असताना पुरुषोत्तम हरवाणी त्यांचा मुलगा आणि झांबानी कार घेऊन महिलेच्या मागे आले आणि तिच्या दुचाकीसमोर कार आडवी करून महिलेची दुचाकी थांबविली आणि कोतवाली ठाण्यात तु दिलेली तक्रार परत घे नाही तर तुझ्या चेहऱ्यावर तेजाब फेकून तुला कापून टाकीन अशी धमकी देऊन तिघेही तेथून पसार झाले. घटनेनंतर महिलेने गाडगेनगर ठाण्यात तक्रार दिली. त्या आधारावर पोलिसांनी गुन्हा दाखल केला.

# मारहाण करून महिलेचा विनयभंग

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३१अमरावती–** महिलेला मारहाण करून विनयभंग केल्याची घटना नांदगावपेठ ठाण्याच्या हद्दित उघडकीस आली. या घटनेत पोलिसांनी महिलेच्या तक्रारावरून एका महिलेसह इसमावर गुन्हा दाखल केला. पंकज भालेराव (दोन्ही. रा. रहाटगाव) अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत.



पीडित महिला शनिवारी सायंकाळी घरासमोर उभी होती. दरम्यान पंकज दारुच्या नशेत आला आणि महिलेला पाहुण शिवीगाळ करीत होता. त्यामुळे महिलेने त्याला तेथून जाण्यास सांगितले असता त्याने शिवीगाळ करीत महिलेचा विनयभंग केला. त्यावेळी अन्य एक महिला तिथे आली आणि तिनेसुध्दा पीडित महिलेला मारहाण केली. त्यामुळे पीडिताने ठाण्यात धाव घेतली.

RNI No. - MAHMAR 2023/84526
Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

# विदर्भ प्रजासत्ताक

सोमवार दि. ३१ मार्च २०२५ | शहर/ग्रामिण


# जिल्हा वकील संघाच्या अध्यक्षपदी अ‍ॅड. सुनील देशमुख

## अ‍ॅड प्रशांत देशपांडे यांच्या पॅनलचा दणदणीत विजय

## उपाध्यक्षपदी अ‍ॅड. आशिष लांडे, सचिवपदी अ‍ॅड. अमोल मुरळ विजयी



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१ अमरावती**

जिल्हा वकील संघाच्या निवडणुकीचे निकाल रविवारी रात्री उशिरा जाहीर झाले. त्यानुसार वकील संघाच्या अध्यक्षपदी अ‍ॅड सुनील देशमुख निवडून आले असून, उपध्यक्षपदी अ‍ॅड आशिष लांडे विजयी झाले आहेत. सचिवपदी अ‍ॅड अमोल मुरळ तर ग्रंथालयसचिवपदी अ‍ॅड विद्या मानके (पाटील) विजयी झाल्या आहेत. विजयी पॅनेलच्या वकिलांनी रात्री उशिरापर्यंत गुलाल उधळून विजयाचा जल्लोश केला.१५९७ मतदारांपैकी तब्बल १४५६ वकील सदस्यांनी शनिवारी मतदानाचा हक्क बजावला होता. रविवार ३० मार्चला सकाळी १० वाजतापासून मतमोजणीला सुरूवात झाली. रात्री उशिरा ११ वाजताच्या सुमारास जाहीर झालेल्या निवडणुकीत अ‍ॅड प्रशांत देशपांडे यांचे पॅनलविजयी झाले. अध्यक्षपदाच्या निवडणुकीत




अ‍ॅडसुनील देशमुख विजयी झाले. त्यांनी प्रतिस्पर्धी उमेदवार अ‍ॅड. हरीष निंबाळकर यांचा पराभव केला. अ‍ॅड देशमुख यांना ९१५ तर अ‍ॅड निंबाळकर यांना ५३२मते मिळाली. उपाध्यक्षपदी विजयी झालेल्या अ‍ॅड आशिष लांडे यांना ७६३ मते मिळाली. सचिवपदी विजयी झालेल्या अ‍ॅड अमोल मुरळ्यांना १०२५ मते मिळाली असून, पराभूत उमेदवार अ‍ॅड नसिर शहा यांना २९२ मते मिळाली आहेत. ग्रंथालय सचिवपदी अ‍ॅड विद्या मानके (पाटील) ७९६ मते मिळवून विजयी झाल्या आहेत. निवडून आलेल्या कार्यकारी सदस्यांमध्ये अ‍ॅड ऋषीकेश उपाध्ये (९२०), अ‍ॅड सुमीत शर्मा (८३९), अ‍ॅड अक्षय गोळे (७७५), अ‍ॅड नेतल मल्ला

### विजयी पॅनलच्या वकिलांचा जल्लोश

(७६१), अ‍ॅड आशिष बरिहार (७४८), अ‍ॅड विशाखा तागडे पाटील) (६८४), अ‍ॅड पुनम रिठे (६५५) यांचा मावेश आहे. जिल्हा वकील संघाच्याअध्यक्षपदासाठी अ‍ॅड. सुनील देशमुखव अ‍ॅड, हरीष निंबाळकर यांच्यामध्ये थेट लढत झाली. जिल्हा ११ पदांसाठी २२ वकील संघाच्या निवडणूकीसाठी १ इच्छुक उमेदवारांनी आपले नामांकन अर्ज दाखल केले होते. अध्यक्ष पदासाठी २, उपाध्यक्ष पदासाठी ३. सचिव पदासाठी ३ व कार्यकारणी सदस्य पदासाठी १३ अशा एकूण ११ पदांसाठी २४ इच्छुक उमदेवारांनी नामांकण निवडणूक निर्णय अधिकारी – अ‍ॅड. रामपाल कंलत्री व सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी अ‍ॅड. शहजाद नैय्यर यांच्याकडे नामांकन दाखल केले होते. निवडणूक रिंगणात तब्बल २२ उमेदवार होते. कडक उन व सणउत्सवाचा माहौल असताना देखील वकील मतदारांमध्ये प्रचंड उत्सुकता होती. निवडणूक निर्णय अधिकारी अ‍ॅड. रामपाल कलंत्री, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी अ‍ॅड. शहजाद नैय्यर यांनी ४० सहाय्यकांसोबत निवडणूकीचे कामकाज पाहिले. रविवारी गुढीपाडव्या दिवशी सकाळी १० वाजतापासून मतमोजणीला सुरूवात झाली. रात्री ११ वाजताच्या सुमारास मतमोजणी पूर्ण झाली.

# मेळघाटच्या सीमापार पुन्हा अवैध ७ पिस्तुलीसह दोघांना अटक

## पोलिसांनी दोन स्थानिक युवकांना घेतले ताब्यात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१ धारणी**

धारणी तालुक्याच्या सीमेवर वसलेल्या मध्यप्रदेशातील खकनार गावातील साई मंदिर समोर मध्य प्रदेश पोलिसांनी दोन युवकांना सात पिस्तुलीसह अटक केल्याने एकच खळबळ उडाली आहे. आरोपी पैकी हरदीपसिंग सिकलीकरच्या विरोधात बालाघाट पोलिस ठाण्यात दोन प्रकरण पंजीबध्द आहेत. धारणी तालुक्यातील बारातांडा गावाजवळच्या बुरहानपुर जिल्ह्यातील खकनार गावाच्या साई मंदिर फाट्याजवळ दोन युवक संशयस्पदरित्याउभे असल्याची माहिती खकनारचे ठाणेदार अभिषेक जाधव यांना समजताच पोलिसपथकाने मोक्यावर पोहचून दोघांना अटक केली. आरोपी जवळ दोन पाचोरी मेड पिस्तुली हस्तगत करण्यात आल्या. पाचोरी निर्मित दोन पिस्तुली सोबत बाळगणारे व वाहतुक करण्याच्या तयारीत असलेल्या हरदिपसिंगतेहरसिंग (१९), रा.पाचोरी, सुभान नरिया भिलाला (५५), रा.पांगरी, जि. बुरहानपुर यांना सापळा रचून पकडण्यात आले. बुरहानपुर जिल्ह्याचे पोलिस अधिक्षक देवेन्द्र पाटीदार यांच्या मार्गदर्शनात अतिरिक्त पोलिस अधिक्षक अंतरसिंग, नेपानगरचे एसडीपीओ निर्भसिंग अलवा यांनी या कारवाईत विशेष भुमिका वठविली. महाराष्ट्रातील बुलढाणा जिल्ह्यातील संग्रामपुर तालुका व मेळघाट व्याघ्र प्रकल्पाच्या व धारणी तालुक्याच्या अगदी सिमेवर वसलेल्या पाचोरी (एमपी) गावात अवैध अग्निशस्त्रे बनविण्योच अनेक कारखाने घराघरात चालतात. अकोला, बुलढाणा व अमरावती जिल्हयाच्या त्रिकोणी सीमेवर जंगलात व राज्याच्याएका पहाडाच्या पायथ्याशी पाचोरीगाव असल्याने भविष्यात मोठी घटना होऊ शकते. २८ मार्च रोजी



मध्यप्रदेश पोलिसांच्या या कारवाईमुळे अवैध बंदुक निमार्ते आणि विकत घेणाऱ्यांचे धाबे दणाणले आहे.


विदर्भ प्रजासत्ताक


# संस्कार भारतीची अविस्मरणीय रौप्य महोत्सवी पाडवा पहाट

## अद्भुत कलाविष्काराने अमरावतीकरांना केले मुग्ध
















**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१अमरावती–** वर्षा ऋतूच वर्णन करणारे 'गरज गरज' नृत्य, भारतीय चित्रपटसृष्टीचा पट 'लखलखत चंदेरी' गीतावरील नत्य, ब्रज बोलीतील पारंपरिक कृष्णाची रासलीला उलगडणारं दाखविणारं होरी नृत्य, निसर्गाशी संवाद साधणारे 'कट्यार' मधील अरुणि किरण गीतावरील नृत्य आणि श्रीरामचरित्राचा स्मरण करणारा त्रिवार जयजयकार या सादरीकरणामुळे संस्कार भारतीचा पाडवा पहाट अविस्मरणीय ठरला.

नवी पिढी मोबाईल, गेम, नूडल्सच्या नादी लागल्याने त्यांच्या स्वास्थ्याचा कसा खेळखंडोबा झाला आहे आणि त्यावर उतारा काय हे दर्शविणारा अप्रतिम लघुनाट्य हे आज, रविवारी गुढीपाडव्याच्या दिवशी सादर करण्यात आलेलया पाडवा पहाटचं वैशिष्ट्य होतं. गुढीपाडव्याने प्रारंभ होणाऱ्या हिदू नववर्ष वर्षाचे स्वागत जल्लोषात तसेच पारंपरिक सुसंस्कृतपणे कसे केले जाऊशकतेतेगेली पंचवीस वर्षे सलग दाखवत आलेल्या संस्कार भारतीने यंदापाडवा पहाटच्यारौप्य महोत्सवी कार्यक्रमात रौप्य महोत्सवी सुवर्णक्षणांचा पट उलगडला. अमरावतीकरांची नववर्ष पहाट व्यंकटेश लॉन मध्ये साडेपाच वाजता शंखनादाने होत आली आहे. याही वर्षी विश्वावसुनाम संवत्सराचा प्रारंभ 'साधयति संस्कार भारती भारते नवजीवनम्स या ध्येयगीताने झाला. पुढले अडीच तास हजारो प्रेक्षकांच्या साक्षीने चाललेला हा कार्यक्रम एकाहून एक सरस गीते, नृत्ये, नाट्यप्रवेश आणि प्रहसनांनीसजला. 'मोरया मोरया' या गणेश स्तवनानंतर गदिमा व सुधीर फडके यांच्या जन्मशताब्दी वर्षात संस्कार भारतीने विदर्भभर राबवलेल्या गीत रामायण महायज्ञाची आठवणताजी करणाऱ्या 'राम जन्मला ग सखे' या गीतावर आकर्षक समूहनृत्य सादर झाले. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त तीन वर्षांपूर्वी सादर झालेल्या कार्यक्रमातील 'अनादि मी अनंत मी' या प्रवेशांमध्ये स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या अंदमानातील छळाचे प्रत्ययकारी चित्रण कलावंतांनी घडविले. शिवरायांना गायलेली 'गुणी बाळ' ही अंगाई, महाराष्ट्राची लोकधारा दर्शविणारे 'लल्लाटी भंडार' नृत्य, विविध प्रदेशातील लोकनृत्यांचं प्रातिनिधिक स्वरूप म्हणून 'घूमर घूमर' देखील अप्रतिमरित्या सादर झाले. त्यानंतर विठू माऊलीची दिडी तर प्रेक्षकांनी अक्षरशः डोक्यावरच घेतली. या संपूर्ण कार्यक्रमाचे ओघवते व अभ्यासपूर्ण सूत्र संचालन प्रा. रसिका वर्षाचा सूर्योदय होताच परंपरागत गुढीचे पूजन करण्यात आले. गेल्या पंचवीस वर्षाच्या पाडवा पहाटच्या वाटचालीत ज्या महानुभावांचे विशेष सहकार्यलाभले असे अस्मिता शिक्षण मंडळाचे मुरलीधरपंत भोंडे, सुरमणी कमलताई भोंडे, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे विभाग संघचालक चंद्रशेखर भोंदू, स्मिता भोंदूयांना मंचावर आमंत्रित करून त्यांचा शाल व श्रीफळदेऊन संस्कार भारतीचे विदर्भ प्रांत महामंत्री विवेक कवठेकर, अमरावतीच्या अध्यक्ष प्रा. डॉ. जयश्री वैष्णव, अ‍ॅड मिलिद वैष्णव यांनी कृतज्ञता व्यक्त केली. कार्यक्रमाचे संचलनप्रा. सीमा पेलागडे यांनी केले व अनुराधा रघुवंशी यांनी आभार मानले.– –

# भवानी जिनिंगला भीषण आग

## ६०–७० लाखाचे नुकसान झाल्याची प्राथमिक माहिती

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३१ वरुड–** शहरापासुन काही अंतरावरच असलेल्या रोषनखेडा येथील भवानी जिनिंग अ‍ॅन्ड प्रेसिंगमध्ये रविवारी दुपारी १२.३० वाजताचे सुमारास अचानक आग लागली. या आगीत आईल मिल परिसरातील ढेप, सरकी, ऑईल मिलचा काही भाग, बारदाणा, केबल, टिना, विद्युत पंपासह विविध साहित्य जळुन या आगीमध्ये अंदाजे ६५ ते ७० लाख रुपयांचे साहित्य जळुन नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे.

प्राप्त माहीतीनुसार, रोषनखेडा येथील नरेंद्र खंडेलवाल यांचे भवानी जिनिंग न्ड प्रेसिंग असून या ठिकाणी मोठ्या प्रमाणात कापसाची खरेदी करुनगठाण तयार केल्यानंतर भारतातील विविध ठिकाणी पाठविल्या जाते. त्याच परिसरात आईल मिल असून त्याच परिसरामध्ये आज दुपारचे सुमारास आग लागल्याचे कर्मचाऱ्यांचे निदर्शनास आले. आग लागल्याचे कळताच कर्मचाऱ्यांनी ही बाब मालक नरेंद्र खंडेलवाल, शरद खंडेलवाल, सौरभ खंडेलवाल यांना सांगितल्यानंतर वरुड आणि शेंदुरजनाघाट नगरपरिषदेच्या अग्निशामक विभाग तसेच पोलिस प्रशासनाला याबाबत माहीती देण्यात आली.प्रशासनाला याबाबत माहीती देण्यात आली. तत्पूर्वी भवानी जिनिंग – अ‍ॅन्ड प्रेसिंग परिसरामध्ये असलेल्या आग विझविण्याच्या साहित्याने आग – विझविण्याचा प्रयत्न सुरु झाला. काही वेळातच वरुड आणि शेंदुरजनाघाट येथील अग्निशमन वाहन घटनास्थळी दाखल होऊन मोठ्या शर्थीने अग्निशमन यंत्रणेच्या कर्मचाऱ्यांनी आग आटोक्यात आणली खरी परंतु या आगीमध्ये मोठ्या प्रमाणात आईल मिल परिसरातील ढेप, सरकी, ऑईल मिलचा काही भाग, बारदाणा, केबल, टिना, विद्युत पंप यासह विविध साहित्य जळून खाक झाले. या आगीमध्ये अंदाजे ६५ ते ७० लाख रुपयांचे साहित्य जळून खाक झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे. – भवानी जिनिंग न्डप्रेसिंग परिसरामध्ये मोठ्या प्रमाणात कापूस, रुई आणि गठाण असून आग वेळीच नियंत्रणात आल्यामुळे पुढील अनर्थ टळला असुन हि आग शॉर्ट सर्किटमुळे लागली असावी असा अंदाज व्यक्त केल्या जात आहे.–

# अचलपुरात १०० रू चा मुद्रांक १५० रू विक्री ?

## तहसील कार्यालयात सर्रास विक्री नागरीकांना वेठीस धरून ज्यादा दराने मुद्रांक विक्री

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१ अचलपुर :**अचलपुर तहसील परिसरात असलेल्या मुद्रांक विक्री विभागात शेतकरी तसेच घरकुल व इतर शाशकीय कामाकरीता लागणारे मुद्रांक हे ज्यास्त दराने विक्री होत आहे . परिसरात काही भामटे अधिकृत मुद्रांक विक्रते कडून मुद्रांक घेऊन १०० रु चे १२० ते १२५ रु पर्यंत पैसे आकरत आहे . शनिवार २९ मार्च रोजी तहसील कार्यालया ला सुटी आहे म्हणून १५० रू पर्यंत मुद्रांक विकत असल्याचे नागरिकांचे ओरड आहे .




अचलपूर तहसील परिसरात असलेल्या मुद्रांक विक्री विभागात अनधिकृत एजंट यांनी घेरला आहे .अधिकृत मुद्रांक विक्रेते हे गैरहजर असताना त्यांच्या अनुपस्थितीत त्यांच्या जवळचे मुद्रांक ११० ते १२० रुपयाला विक्री होत असल्याचे धक्कादायक माहिती पुढे येत आहे . आज २९ मार्च रोजी शनिवार असल्यामुळे इतर वाईंडर कार्यालयात येन्या आधी एक अनधिकृत एजंट गरजवंतांना १००रू मृद्रांक १५० रू याला विकत होता . उपस्थित शेतकरी व एका महिलेने १००रु चा १५० ला कसा विचारले असता . आज सुटी आहे तरी मी स्टॅप देत आहे पटल तर घ्या नाहीतर जा इथुन अस म्हणत बाहेर जाण्यास सांगितले . मार्च महिना असल्यामुळे अनेकांचे व्यवहार हे याच महिन्यात पुर्णत्वास जात असतात याचाच फायदा तहसील कार्यालयात असलेले अनधीकृत एजंट घेत असुन शेतकरी , घरकुल लाभार्थी तसेच सामान्य नागरीकांना लुटत आहेत . या अनधिकृत एजंट ला कोरे मृदांक देणाऱ्या अधिकृत मुद्रांक विक्रतेवर ही कारवाई करण्याची मागणी होत आहे . तालुक्यातील असदपुर येथील आशीष मुंदाने नामक युवक घरकुल कामा करीता तहसील कार्यालयात पृथ्वी नामक विक्रेत्यस स्टॅप मागीतला तुमच्या आईचा नावाने स्टॅप देता येत नाही २० रू ज्यादा दयावे लागतात आम्हाला ही पुढे द्यावे लागते म्हणत असल्याने नाईलाजास्तव पत्रकार सतीश आकोलकर १०० रु चे १२० रू द्यावे लागले .

# संघाच्या तपस्येतून विकसित भारताचा नवा अध्याय - पंतप्रधान नरेंद्र मोदी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१नागपूर-**
२०४७ साली स्वातंत्र्याची शंभर वर्षे पूर्ण करत असताना विकसित भारताचे स्वप्न पूर्ण करण्यावर सर्वांचा भर राहणार आहे. संघटन, समर्पण आणि सेवेची त्रिवेणी हेच भारत देशाला पुढे घेऊन जाण्यासाठी महत्त्वाचे सूत्र ठरणार आहे. देशाला ही सूत्रे देणाऱ्या संघाच्या तपस्येतूनच विकसित भारताचा नवीन अध्याय लिहिला जात आहे, असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले. रविवारी नागपुरात माधव नेत्रालयाच्या प्रीमियम सेंटरच्या भूमिपूजनप्रसंगी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

पंतप्रधान मोदी यांनी साडे चार तासांच्या दौऱ्यात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा डॉ. हेडगेवार





स्मृतिमंदिर परिसर तसेच दीक्षाभूमीलादेखील भेट दिली. सोलर एक्स्प्लोसिव्हमध्ये टेस्ट रेंज, रनवेचे उद्घाटनही त्यांनी केले.

माधव नेत्रालयाच्या कार्यक्रमाला सरसंघचालक डॉ. मोहन भागवत, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, स्वामी अवधेशानंदगिरी महाराज, स्वामी गोविंददेवगिरी महाराज, माधव नेत्रालय चॅरिटेबल ट्रस्टचे उपाध्यक्ष निखिल मुंडले, महासचिव डॉ. अविनाशचंद्र अग्निहोत्री हे उपस्थित होते.

कोणत्याही देशाचे अस्तित्व हे त्या देशातील पिढ्यानपिढ्या चालत आलेल्या त्याच्या संस्कृतीच्या विस्तारावर अवलंबित असते.आपल्यावर एवढे परकीय हल्ले झाले, आपली संस्कृती नष्ट करण्याचे प्रयत्न झाले, तरी भारतीय संस्कृतीची चेतना मिटली नाही.कारण ही चेतना जागृत ठेवणारी अनेक आंदोलने भारतात होत राहिली आहेत. शंभर वर्षाअगोदर राष्ट्रीय चेतनेच्या बीजाचा आज वटवृक्ष झाला आहे.संघ भारताच्या संस्कृतीचा कधीही न मिटणारा अक्षयवट आहे. संघ हा देशहितासाठी बाह्य व आंतरिक दृष्टी चेतना जागृत करणारा यज्ञ आहे.

गरिबातील गरिबाला सर्वोत्तम उपचार देण्यावर केंद्र सरकारचा भर आहे. मातृभाषेत वैद्यकीय शिक्षण देण्याचा आम्ही निर्णय घेतला आहे, ज्यामुळे वंचित समाजातील मुलेदेखील वैद्यकीय क्षेत्रात करिअर करू शकतील.आयुष्मान भारत योजनेमुळे कोट्यवधी लोकांना मोफत उपचार मिळत आहेत. यामुळे जनतेचे हजारो कोटी रुपये वाचत आहेत.

### माधव नेत्रालय महत्त्वाची संस्था ठरेल : मुख्यमंत्री

दृष्टी ही ईश्वराने मानवाला दिलेला मौल्यवान ठेवा आहे. ज्यांच्याकडे दुर्दैवाने ही दृष्टी नाही त्यांच्या जीवनात प्रकाश आणण्याचे कार्य माधव नेत्रालय गत तीन दशकांपासून करत आहे. नेत्र आरोग्य क्षेत्रात भरीव सेवा देण्याची आवश्यकता आहे. प्रीमियम सेंटरमुळे मध्य भारतातील नेत्र आरोग्य क्षेत्रात सेवा देणारी माधव नेत्रालय ही महत्त्वाची संस्था ठरेल, असा विश्वास मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केला.

### दृष्टिहीनांची समस्या समाजासाठी शोभनीय नाही: सरसंघचालक डॉ. भागवत

दृष्टिहीनांची समस्या समाजासाठी शोभनीय नाही. संघाच्या कार्यातून समाजात सेवाकार्याची दृष्टी निर्माण होत आहे. समाजानेही यात सहभाग घेतल्याने संघासमोरील अडचणी दूर झाल्या व देशहिताच्या कार्याचा मार्ग सुकर झाला. सेवाकार्य दयाभावाने नव्हे, तर मनात आपुलकीचा भाव उत्पन्न करूनच चालवले जाऊ शकते. सेवेतून जीवनदृष्टी मिळते, असे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत म्हणाले.

# जगातील कोणतीही शक्ती भारताला दुर्बल करू शकणार नाही; शरद पवार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१मुंबई** -डॉ. बाबासाहेबांनी आपली घटनाच अशी लिहिली आहे ज्यामुळे भारत देशावर कितीही आघात झाले तरी देश एकसंधच राहील. जगातील कोणतीही शक्ती ह्या देशाला दुर्बल करू शकणार नाही. राज्यकर्ते येतील - जातील पण लोकशाहीचा मार्ग हा कुणालाच सोडता येणार नाही. अनेकदा काही निर्णय घेतले गेले आणि कालांतराने मागे घ्यावे लागले. आणीबाणीचा निर्णय घेतला गेला. तेव्हा लोकांमध्ये प्रचंड लोकप्रिय असणारं इंदिरा गांधींसारखं नेतृत्व आणीबाणीच्या माध्यमातून संविधानावर आघात करतंय असं जाणवताच जनतेने भूमिका घेतली आणि तेव्हा इंदिरा गांधींनाही पराभवाला सामोरं जावं लागलं असं सांगत ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी संविधान गौरव सोहळा कार्यक्रमात केले.

यावेळी शरद पवार म्हणाले की, आज हिंदुस्थानच्या आजूबाजूच्या देशांची परिस्थिती काय आहे? श्रीलंका पाहा, तिथे लष्करशाही आली. पाकिस्तान, चीन बघा, तिथे हुकूमशाही आली. बांगलादेशची परिस्थिती बघा, तिथेही लष्कराचं राज्य आलं. त्यामुळे आपल्या आजूबाजूच्या देशांमध्ये बदल घडत त्या देशातील घटनेवर आघात होत राहिले पण भारत हा एकमेव देश आहे जिथं कितीही संकटं



आली, कितीही दबाव आला तरीही ह्या देशाच्या संविधानाने देश एकसंध ठेवला. त्यामुळे हा देश एकसंध ठेवण्याचं श्रेय कुणाला जात असेल तर ते डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना जातं असं त्यांनी सांगितले.दरम्यान, आपण कुठेही असोत, कुठल्याही राजकीय पक्षाचे असोत, संघटनेचे असोत पण आपण एका गोष्टीसंबंधीचा निकाल घेतला पाहिजे की, आम्ही काहीही गोष्टी मान्य करू पण संविधानाचं रक्षण ह्यात तडजोड होणार नाही. ते संविधान आणि त्याचं महत्त्व हे समजण्यासाठी शेवटच्या माणसापर्यंत संविधान, संविधानाचा विचार, संविधानाचं योगदान व निर्मितीमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केलेले कष्ट हा देश कधी विसरणार नाही असंही शरद पवारांनी म्हटलं.

# महाबोधी महाविहाराचे संचालन बौध्दांच्या ताब्यात द्या

## भदंत ससाई यांचे पीएम मोदींना निवेदन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१नागपूर**
पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी सकाळी दीक्षाभूमीला भेट दिली. यावेळी त्यांनी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अस्थिकलशावर पुष्प अर्पण करून अभिवादन केले. तथागत गौतम बुध्दाच्या प्रतिमेसमोर नतमस्तक झाले. याप्रसंगी डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती दीक्षाभूमीचे अध्यक्ष भदंत आर्य नागार्जुन सुरेई ससाई यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे स्वागत केले. तसेच बुद्धगया येथील महाबोधी महाविहाराचे व्यवस्थापन बौद्धांच्या हाती सोपवा आणि दीक्षाभूमीसाठी अतिरीक्त जागा देण्यात यावी, या आशयाचे निवेदन दिले.

पंतप्रधान मोदी सकाळी ९.३० वाजता दीक्षाभूमीत पोहोचले. सर्वप्रथम डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अस्थिकलशावर पुष्प वाहिले आणि वंदन केले. त्यानंतर तथागत गौतम बुध्द यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करून अभिवादन केले. यावेळी ससाई यांनी त्रिशरण पंचशील म्हटले. यानंतर दीक्षाभूमी स्मारक समितीतर्फे अध्यक्ष भदंत सुरेई ससाई यांनी पंतप्रधान मोदी यांना शाल, आणि सोनेरी रंगात कोरलेली दीक्षाभूमी स्तुपाची प्रतिकृती भेट देवून त्यांचे स्वागत केले. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर लिखित बुध्द आणि त्यांचा धम्म ग्रंथ भेट दिले.

निवेदनात म्हटले की, बोधगया हे जगातील सर्व बौद्धांचे पवित्र स्थान आहे. या ठिकाणी तथागत गौतम बुद्धांना संबोधी प्राप्त झाली होती. या महाविहाराची निर्मिती सम्राट अशोक यांनी केली होती. तेथील १९४९ बीटी क्ट रद्द करून महाबोधी महाविहाराचे व्यवस्थापन बौद्धांच्या हाती द्यावे. तसेच दीक्षाभूमीत येणाऱ्या अनुयायांसाठी जागा अपूरी पडत आहे. भविष्याचा विचार करता माता कचेरी, कॉटन रिसर्च सेंटर येथील २१ एकर जागा दीक्षाभूमीला देण्यात यावी, अशी निवेदनाद्वारे विनंती केली.

याप्रसंगी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रिय मंत्री नितीन गडकरी, राज्याच्या मुख्य सचिव सुजाता सौनिक, स्मारक समितीचे सदस्य डॉ. राजेंद्र गवई, विलास गजघाटे, एड. आनंद फुलझेले, एन.आर. सुटे, दादाराव दाभाडे उपस्थित होते. - डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांनुसार देशाला विकासाकडे नेणार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दीक्षाभूमीतील नोंदवहीत आपला संदेश लिहिला. त्यात त्यांनी लिहिले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पंचतीर्थांपैकी एक असलेल्या नागपूर स्थित दीक्षाभूमीला भेट देण्याचे सौभाग्य लाभल्याने मी भारावून गेलो आहे.



### पुष्पवर्षावाने स्वागत

दीक्षाभूमीवर पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त होता. चारही बाजूंनी रस्ता बंद करण्यात आला होता. असे असतानाही चौकांमध्ये नागरिक पंतप्रधानांच्या स्वागतासाठी जमले होते. पंतप्रधानांचा ताफा येताच नागरिकांनी पुष्पवर्षाव करून त्यांचे स्वागत केले. पंतप्रधान मोदींनीही नागरिकांना हात दाखवून त्यांच्या स्वागताचा स्वीकार केला.


या पवित्र स्थळाच्या वातावरणात बाबासाहेबांच्या सामाजिक समता, समानता आणि न्यायाच्या तत्त्वांचा अनुभव येतो. दीक्षाभूमी आपल्याला गरीब, वंचित आणि गरजूंसाठी समान हक्क आणि न्यायाच्या व्यवस्थेसह पुढे जाण्याची ऊर्जा प्रदान करते. मला पूर्ण विश्वास आहे की या अमृत काळात आपण बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा आणि मूल्यांचा मार्ग अनुसरून देशाला प्रगतीच्या नवीन शिखरावर नेऊ. एक विकसित आणि सर्वसमावेशक भारत घडवणे हीच बाबासाहेबांना आपली खरी आदरांजली ठरेल.

### - दीक्षाभूमीला दुसऱ्यांदा भेट देणारे एकमेव पंतप्रधान

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दीक्षाभूमीला दुसऱ्यांदा भेट दिली. यापूर्वी १४ एप्रिल २०१७ साली त्यांनी दीक्षाभूमीला भेट दिली होती. दीक्षाभूमीला दोनदा भेट देणारे ते पहिले पंतप्रधान आहेत. पहिल्यांदा त्यांनी भेट दिली तेव्हा दीक्षाभूमीवर ध्यानसाधनाही केली होती. त्यामुळे स्मारक समितीने या वेळीसुद्धा तशी व्यवस्था केली होती. परंतु या वेळी मात्र त्यांनी ध्यान केले नाही. बुद्धवंदना मात्र ग्रहण केली.

# प्रशांत कोरटकरच्या दोन कार नागपुरातून जप्त; कृत्याचा पश्चात्ताप; पण न्यायालयात मौन


विदर्भ प्रजासत्ताक
**दि.३१नागपूर-** इतिहास संशोधक इंद्रजीत सावंत यांना मोबाइलवरून धमकावणारा प्रशांत कोरटकर पोलिसांच्या चौकशीत वारंवार पश्चात्ताप व्यक्त करीत आहे. अनावधानाने चूक झाल्याचे सांगत असला, तरी न्यायालयात मात्र याबद्दल मौन बाळगत आहे. पसार काळात त्याने वापरलेल्या कार पोलिसांनी नागपुरातून जप्त केल्या, तसेच १७



ते २४ मार्चच्या दरम्यान त्याला खर्चासाठी दीड लाखाची रोकड कोणी दिली, याचीही माहिती घेण्याचे काम पोलिसांकडून सुरू आहे.कोरटकर याने पसार काळात नागपूर, चंद्रपूर, बैतूल, हैदराबाद (आंध्र प्रदेश), इंदूर आणि करीमनगर (तेलंगणा) येथे वास्तव्य केले. यासह तो वावरलेल्या एकूण १८ ठिकाणांची पडताळणी करण्याचे काम पोलिसांकडून सुरू आहे. नागपुरात गेलेल्या पथकाने कोरटकर याची एक आलिशान कार जप्त केली, तसेच त्याचा मित्र मटका बुकी धीरज चौधरी याचीही कार जप्त केली.

# औरंगजेबाची कबर म्हणजे महाराजांच्या शौर्याचे प्रतीक

## राजकीय पोळी भाजण्यास इतिहासाचा वापर- राज ठाकरे



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१मुंबई** औरंगजेबाची कबर ही छत्रपती संभाजी महाराज यांच्या शौर्याचे प्रतीक असून कबरीजवळील सजावट काढून तेथे मोठा फलक लावा की, मराठ्यांना हरवायला आलेला औरंगजेब इथे गाडला गेला, असे म्हणत मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी या मुद्द्यावरून

### कर्ज वाढेल, लाडकी बहीण योजना बंद होईल

लाडकी बहीण योजनेतून महिलांना २१०० रुपये देण्याचे आश्वासन दिले होते. तसे केल्यास राज्यावर कर्ज होईल. त्यामुळे ही योजना बंद होणार, असेही राज म्हणाले.

राजकारण करणाऱ्यांवर टीका केली. शिवाजी पार्कवरील मनसेच्या गुढीपाडवा मेळाव्यात ते बोलत होते.

मूल प्रश्न सोडून आपल्याला औरंगजेबाची पडली आहे. जगाच्या इतिहासात औरंगजेब वाचला जातो. त्यानंतर लोकांना छत्रपती शिवाजी महाराजांचे शौर्य कळते. चित्रपटाने जागे होणारे हिंदू काही कामाचे नाहीत, असा टोलाही राज यांनी लगावला.जातीपातीत भिडवून द्यायला इतिहास सोपा आहे. यांना ब्राह्मणांनी साथ दिली, त्यांना मराठ्यांनी साथ दिली, हे सगळे बोलणाऱ्यांचा इतिहासाशी काहीही संबंध नाही. त्यांना फक्त पोळी भाजून घ्यायची आहे, अशी टीकाही राज यांनी केली.अफझलखान प्रतापगडावर आला होता. त्याला पायथ्याशीच पुरला. त्याची कबर महाराजांना विचारल्याशिवाय बांधली गेली का? शक्यच नाही. ज्यांना गाडलंय त्यांची प्रतीकं नेस्तनाबूत करुन चालणार नाहीत. जगाला दाखवले पाहिजे आम्ही यांना इथे गाडलंय, आम्ही पुरून उरलो, असे राज म्हणाले.

देवेंद्र फडणवीस यांना माझे आवाहन आहे. तुमच्या हाती चांगले राज्य आलेले आहे. मराठी माणसाचे हित पाहणार असाल तर आमचा तुम्हाला पाठिंबा आहे.आपण धर्माच्या नावाखाली नद्या बरबाद करतोय. महाराष्ट्रातील ५५ नदीपट्टे धोक्याच्या पातळीवर आहेत. सर्वात प्रदूषित नद्यांमध्ये मिठी, उल्हास, मुळा, मुठा, सावित्री, चंद्रभागा, इंद्रायणी नद्या आहेत. मुंबईतील पाचपैकी चार नद्या मेल्या. पाचवी मिठी नदी मरायला आली. याविरोधात बोलल्यानंतर थर्म आडवा येणार, असे उत्तर राज यांनी दिले.

# आमदारांच्या घरासमोर टेम्भे पेटवणार.....

## कर्जमाफीच्या मुद्द्यावरून बच्चू कडू आक्रमक:

## प्रहार संघटनेचे ११ एप्रिलला राज्यभर आंदोलन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१ बारामती**
शेतकरी कर्जमाफीच्या मुद्द्यावरून प्रहार संघटनेचे अध्यक्ष बच्चू कडू पुन्हा एकदा आक्रमक झाले आहेत. शेतकरी कर्जमाफीच्या मागणीसाठी प्रहार संघटनेकडून राज्यभर आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे. ११ एप्रिल रोजी आमदारांच्या घरांसमोर टेम्भे पेटवून आंदोलन करणार असल्याचा इशारा बच्चू कडू यांनी दिला आहे.

बारामती मधील शिवनगर येथील दि माळेगाव सहकारी साखर कारखाना लिमिटेड येथे एका कार्यक्रमावेळी बोलताना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शेतकऱ्यांना ३१ मार्चपर्यंत कर्ज भरण्याचे आवाहन केले होते. इतकेच नाही तर याच वर्षी काय? पुढच्या वर्षी देखील शेतकऱ्यांना कर्जमाफी मिळणार नसल्याचे त्यांनी थेटच सांगितले. यामुळे महायुती सरकारने जाहीरनाम्यात दिलेले शेतकरी कर्जमाफीचे आश्वासन पूर्ण होणार नसल्याचे स्पष्ट झाले आहे. यावरून विरोधकांकडून सरकारवर टीका केली जात आह. अशातच आता बच्चू कडू हे देखील आक्रमक झाले असून त्यांनी शेतकरी कर्जमाफीच्या मागणीसाठी राज्यभर आंदोलन करण्याचा इशारा



आज गुढीपाडवा दिवशी सरकारला दिला आहे.

### 'स्वाभिमानी'ची जिल्हाधिकारी कार्यालयावर काळी गुढी

दरम्यान, दुसरीकडे स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने देखील आज गुढी पाडव्यादिवशी अजित पवार यांनी शेतकरी कर्जमाफीबद्दल केलेल्या विधानाचा कोल्हापूर येथे निषेध केला. यावेळी स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने कोल्हापूर जिल्हाधिकारी कार्यालयावर काळी गुढी उभारून सरकारचा निषेध करण्यात आला. एकीकडे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभा निवडणुकीआधी १०० दिवसाच्या आत शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करणार असल्याची आश्वासन दिले होते. शिवाय भाजपच्या जाहीरनाम्यामध्ये सदर शेतकरी कर्जमाफीचा उल्लेख होता. परंतु, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केलेल्या वक्तव्याचा देवेंद्र फडणवीस यांनी समर्थन करून स्वतःचे व सरकारचे अपयश दाखवून दिले, अशी टीका स्वाभिमानीच्या वतीने करण्यात आली.-

### नेमके काय म्हणाले बच्चू कडू?

आज गुढीपाडव्यानिमित्त बच्चू कडू यांनी प्रहारच्या राज्यभरातील कार्यकर्त्यांची बैठक बोलावली आहे. संघटन बांधणी धिक मजबूत करण्यासाठी ही बैठक असल्याचे बच्चू कडू यांनी गितले. तसेच सरकारने निवडणुकीच्या वेळेस शेतकरी कर्जमाफी णि हमीभावाचे आश्वासन दिले होते, त्यासंदर्भात एक मोठे दोलन उभे करणार आहोत. या आंदोलनाची सुरुवात ११ एप्रिल ी महात्मा फुले जयंतीच्या दिवशी महाराष्ट्रातील सर्व आमदारांच्या ासमोर रात्री १२ वाजता गळ्यात निळा दुपट्टा आणि हातात भगवा डा घेऊन टेम्भे मशाल पेटवण्याचे आंदोलन करणार आहोत. वडणुकीच्या वेळी सरकारने जे आश्वासन दिले होते, त्याची दखल ावी किंवा टेम्भेच्या मशालीने आम्हाला पेटवून द्या, असे निर्देश कारला देणार आहोत. दिलेल्या शब्दाची आठवण देण्यासाठी ११ एप्रिल रोजी रात्री १२ वाजता हे आंदोलन करणार आहोत.

विदर्भ प्रजासत्ताक

# धामणगाव रेल्वेमध्ये ईद-उल-फितरची नमाज ईदगाहमध्ये अदा : एकमेकांना दिल्या ईदच्या शुभेच्छा



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१धामणगाव रेल्वे**

रमजानच्या पवित्र महिन्यानंतर ईद-उल-फितरचा आनंद सोमवारला (ता.३१) शहरासह संपूर्ण तालुक्यात उत्साह आणि आनंदाने साजरा करण्यात आला.शहरातील ईदगाह (कब्रस्तान) येथे मुस्लिम बांधवांनी सजदा करून देशाच्या सलामती आणि प्रगतीसाठी दुआ मागितली. नमाजीनंतर लोकांनी एकमेकांना ईदच्या शुभेच्छा दिल्या.

शहरातील मदिना मस्जिद, मस्जिद चिश्तिया उस्मानिया, चिश्तिया ताजिया मस्जिद येथे मोठ्या संख्येने लोकांनी नमाज अदा केली. सर्वाधिक गर्दी स्थानिक ईदगाह (कब्रस्तान) येथे पाहायला मिळाली, जिथे सकाळी ८ वाजता ईदची नमाज अदा करण्यात आली. जामा मस्जिद (मरकस) चे इमाम हाफिज अख्तर यांनी सर्वांना ईदच्या शुभेच्छा दिल्या.जामा मस्जिद (मरकस) चे इमाम हाफिज अख्तर यांनी सांगितले की, रमजानच्या रोजांच्या नंतर ईद हा आनंद आणि नेकी वाटण्याचा दिवस असतो. ईदच्या नमाजसाठी दत्तापूर ठाणेदार गिरीश ताथोड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस प्रशासन पूर्णपणे सतर्क होते.येथील सर्व मस्जिद व ईदगाह (कब्रस्तान) बाहेर कडेकोट सुरक्षा व्यवस्था करण्यात आली होती.ईदचा उत्सव फक्त नमाजपर्यंतच मर्यादित नव्हता, तर घरोघरी स्वादिष्ट पदार्थांचा आनंद घेतला गेला. गोड शेवई, मेव्याने भरलेली दूधशीर शेवई, सूतफेनी, दहीवडे, फुलक्यांची चव चाखण्यात आली. मसालेदार चणे आणि खास बिर्याणीचा आनंद लुटण्यात आला.

जामा मस्जिद (मरकस) चे इमाम हाफिज अख्तर यांनी सांगितले की, हा सण इस्लाम धर्माच्या अनुयायांच्या एकता आणि आध्यात्मिक शुद्धतेचे प्रतीक आहे. ईदच्या दिवशी विशेष नमाज अदा केली जाते. या वेळी आम्ही अल्लाहचे आभार मानतो आणि नकळत झालेल्या चुका माफ करण्याची प्रार्थना करतो. या प्रसंगी विशेष दुआ करण्यात येतात आणि गरजू लोकांमध्ये फित्रा आणि जकात वाटली जाते.

# कुंभारवाडा येथील पट्टाभि श्रीराम मंदीर येथे श्रीरामनवमी उत्सवाचे भव्य आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१अमरावती**

अमरावती शहर कुंभारवाडा येथील पट्टभि श्रीराम मंदिर संस्थान: भव्य श्रीराम नवमी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. हा उत्सव रविवार, ३० मार्च २०२ पर्यंत सुरू असून सोमवार, ८ एप्रिल २०२४ पर्यंत सुरू आहे.

या महोत्सवाचे विविध धार्मिक कार्यक्रम करण्यात आले. लोकसभा कीर्तन, प्रवचन, भजन आणि इतर धार्मिक कार्यक्रमांचा समावेश आहे. या कार्यक्रमांना अमरावती जनता भाविकांचा लाभ घ्यावा असे आवाहन विश्वस्त मंडळाकडून करण्यात येत आहे.

**श्रीराम जन्मोत्सव कार्यक्रम:**

या महोत्सवाचा मुख्य कार्यक्रम म्हणजे श्रीराम जन्मोत्सव. हा कार्यक्रम रविवार, ६ एप्रिल २०२४ रोजी १२.०० होणार आहे. या कार्यक्रमासाठी मंदिराला विशेष सजावट करण्यात आली आहे. या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी अमरावती महानगरपालिकेचे श्री. सचिन कलंत्रे, अमरावती जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष श्री. अनिल अग्रवाल, अमरावतीचे माजी महापौर श्री. विलास इंगोले आणि बाराबलुतेदार महासंघाचे अध्यक्ष डॉ. श्रीराम कोल्हे हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित आहेत.



३० मार्च गायत्री महिला भजनी मंडळ, माळीपुरा तर ३१ मार्च एकविरा महिला भजनी मंडळाने मंत्रमुग्ध करणारे भजन सादर केले.

१ एप्रिल श्री मुरलीधर महिला भजनी मंडळ, २ एप्रिल गजानन महाराज महिला भजनी मंडळ, कुंभारवाडा, ३ एप्रिल गजानन महिला भजनी मंडळ, ४ एप्रिल ब्रह्मचैतन्य महिला भजनी मंडळ आणि ५ एप्रिल राधाकृष्ण महिला भजनी मंडळ व्दारे भजन सादर होईल. तसेच सुंदरकांड पठण होईल.

६ एप्रिल श्रीराम जन्मोत्सव १२:०० सत्य घटना होईल. श्री. अनिल गुल्हाने अमरावती श्रीराम कथा वाचतील. तसेच, पद्मावती महिला भजनी मंडळ व्दारे भजन सादर होईल.

७ एप्रिल ते ९:०० सत्यनारायण पूजा होईल. खाली भक्तीर महिला भजनी मंडळाव्दारे भजन सादर होईल आणि यानंतर गोपालकाला कार्यक्रम होईल. भजनी मंडळाचा कार्यक्रम सौ. मीनाताई गुल्हाने व सौ. संगिताताई तिप्पट यांच्या मार्गदर्शनात आहे. तरी सर्वांनी याचा लाभ घ्यावा अशी पट्टाभि श्रीराम विश्वासर संस्थानचे अध्यक्ष डॉ. विलास नादुरकर, श्री. अंबादास नलगे, सचिव श्री. राजेश हरमकर, सहसचिव श्री. गोपाल कळसकर, कोषाध्यक्ष श्री. विवेक अंबुलकर, सदस्य श्री. हरिसिंग ठाकूर, श्री. संजय खारकर, श्री. महेश नादुरकर, श्री. लक्ष्मण शिरभाते, श्री. सुरेश पाखरे, सौ. मीनाताई गुल्हाने यांनी केली आहे. कायक्रमासाठी श्रीपाल कळसकर यांच्या गोटात खाली खाली गठीत केली असून श्री ऋषिकेश ठाकूर व विटाळकर यांचा समावेश आहे.

# पतसंस्थेतील महिला कर्मचाऱ्यास शिविगाळ

## संस्थेच्या अध्यक्षांसह दोन संचालकांविरुद्ध गुन्हा दाखल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१अमरावती**

एका पतसंस्थेत कार्यरत असलेल्या महिला कर्मचार्यास या संस्थेच्या दोन संचालकांनी रजिस्टरवर नोंद घेण्याच्या कारणावरुन अश्लिल शिविगाळ केली. महिलेच्या तक्रारीवरुन शहर कोतवाली पोलिसांनी संस्था अध्यक्षांसह दोन संचालकांविरोधात गुन्हा दखल केला आहे.सदर महिला या पतसंस्थेत शिपाई पदावर कार्यरत आहे. त्या कर्तव्यावर कार्यरत असतांना शनिवारी सायंकाळी ५.३० वाजता संस्थेचे संचालक अमोल काकडे व निलेश कदम संस्थेत आले. त्यांनी त्यांच्याकडील कागदपत्रे आवक रजिस्टर मध्ये नोंद करुन घेण्यास सांगीतले. सदरची नोंद संस्थेचे सचिवांना विचारून घेतो असे म्हटले असता दोघांनी शिविगाळ करीत तु एक संस्थेची चपराशी आहे, तुला हे काम कोणी सांगीतले, तु उद्यापासुन कार्यालयाबाहेर ड्युटी करावी, अशी धमकी दिली. लज्जास्पद आरोप केल्याने सदर महिलेने शहर कोतवाली पोलिसात तक्रार दिली. या तक्रारीवरुन पोलिसांनी संस्था अध्यक्ष महेश जाधव यांच्यासह संचालक अमोल काकडे व निलेश कदम या तिघांविरुध्द गुन्हा दाखल केला आहे.

# चांदूर रेल्वे शहरात 'ईद-उल-फित्र' उत्साहात साजरी : ईदगाह वर सामुहीक नमाज पठन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१चांदूर रेल्वे**

मुस्लिम बांधवांचा रमजान ईद हा सण चांदूर रेल्वे शहरात आज सोमवारी मोठ्या उत्साही वातावरणात साजरा करण्यात आला. यावेळी शहरासह तालुक्यातील शेकडोंच्या संख्येने आलेल्या मुस्लीम बांधवांनी ईदगाह मैदानावर सामूहिक नमाज पठण करत अल्लाहला साकडे घातले.महिनाभर रमजानचे रोजे ठेवल्यानंतर सोमवारी मुस्लिम बांधवांनी ईद-उल-फित्र उत्साहात साजरी केली. मुस्लिम धर्मातील अनेक उत्सवांमधील महत्त्वाचा उत्सव म्हणजे 'रमजान ईद'.



आपापसांतील हेवेदावे व मत्सर विसरून सर्वांनी एकत्र यावे, असा संदेश या सणाने दिला. रमजान ईद म्हणजे जणू मानवीमनाचे दुवे साधण्याबरोबरच आत्मशुद्धीची शिकवण देणारा सण. ईदच्या नमाजासाठी ईदगाहमध्ये जाण्यापूर्वी दानधर्म करण्याचा संदेश मुस्लिम धर्मात देण्यात आला आहे. त्यालाच 'सदका-एक-फित्र' म्हणतात. ईद साजरी करत असतांना समाजातील दीनदुबळ्यांबाबत जाणीव असावी, हाच त्यामागचा उद्देश. याच अनुशंगाने अनेक शहरवासीयांनी गरीब व गरजूंना आर्थिक स्वरूपात मदत करूनच ईदच्या नमाजासाठी ईदगाहवर प्रवेश केला. शहरातील ईदगाह मैदानावर सकाळी ८ वाजता मुख्य नमाज अदा करण्यासाठी शहर आणि परिसरातील अनेक मुस्लिम बांधवांनी गर्दी केली होती. यासोबत कुऱ्हा रोडवरील चौकातील मस्जिदमध्ये सुध्दा सकाळी ८.३० वाजता ईदची नमाज पठन केली. नमाजनंतर शांततेसाठी दुआ करून एकमेकांची गळाभेट घेतली अन् ईदच्या शुभेच्छा देण्यात आल्या.

ईदनिमित्त सकाळपासून मुस्लिम बांधव नवीन कपडे घालून नमाज अदा करण्यासाठी ईदगाह मैदानाकडे जात होते. तेथे या सर्वांनी एकत्रित येऊन ईद-उल-फित्र' साजरी केली.

ईदच्या दिवशी प्रत्येक मुस्लिम बांधवांच्या घरी बनवला जाणारा गोड पदार्थ म्हणजे शीरखुर्मा. दूध, शेवया आणि विविध प्रकारच्या सुक्यामेव्याचे मिश्रण असलेला शीरखुर्मा ईदचा आनंद द्विगुणित करतो. शीरखुर्म्याची लज्जत चाखण्याकरिता सकाळपासून प्रत्येक मुस्लिम बांधवांच्या घरात लगबग सुरू होती.

# भगतसिंग चौकात शुध्द थंड थंड पिण्याच्या मशीनचे लोकार्पण

## श्री नवदुर्गा नागरी सहकारी पतसंस्थे व अमर शहीद भगतसिंग मंडळ सौजन्याने सेवाभावी उपक्रम

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१धा.रेल्वे**

तहानलेल्यांची तृष्णा भागविएवढा धर्म नाही. सामाजिक जाणिवेचे भान ठेऊन येथील श्री नवदुर्गा नागरी सहकारी पतसंस्थेचे भाग व अमर शहीद भगत मंडळाचे सौजन्याने अमर शहीद भगतसिंग चौकात शुध्द थंड पिण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. स्वयंसेवक संघाचे अखिल



भारतीय कार्यकर्ता सदस्य चंद्रशेखर राठी यांच्या प्रमुख सुरक्षा रविवारला (ता.३०) करण्यात आले.

येथील अमर शहीद भगतस चौक लागून रेल्वे स्थानकाला आहे. त्या स्थानी चौकातींगची वर्दळ असते. सर्वांसाठी मालची बॉटल विकत प्राप्ती संभवता. उन्हाळ्यात लहान नागरी तेव्हा गरज असते, श्री नवदुर्गी सहकारी पतसंस्थेचे भाग व अमर शहीद भगतसिंग मंडळाचे स्वयंनेमाने स्वतःचे कार्य करत आहे. त्यांचे कार्य समाजाला प्रेरणादायी आहे. भगतसिंग चौकात शुध्द थंड पिण्याची राष्ट्रीय व्यवस्था आहे. लोकार्पण महिला प्रताप अडसड हे यांच्या व स्वयंसेवक संघाचे अखिल भारतीय कार्यकर्ता सदस्य चंद्रशेखर राठी यांच्या प्रमुखत रविवारला (ता.३०) सदस्या पतसंस्थेचे संचालक योगेश अंभोरे, मुख्य व्यवस्थापक दिनेश बोबडे, माजी नगर परिषद सदस्य विनोद धुरवे, प्रशांत बदनोरे, चंदू पाटील, अविनाश देशमुख, विनोद जैस्वाल, नवनीत हुलुमारे, नवीन धोटे, अविनाश पेटले, बंदिनी नागोसे, राजू घडडीनकर, बंछानी नागोसे, राजू घडीनकर. अशोक शर्मा यांनी केले.

# काँग्रेसचा नववर्षाचा गुढीपाडवा सोहळा गुढी उभारून काँग्रेस भवन येथे संपन्न :नववर्षानिमित्त एकजुटीने जनसेवेकरीता होणार सज्ज

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१ अमरावती**

गुढीपाडवा हा मराठी नववर्षाचा शुभारंभाचा मंगल प्रसंग आहे,जो आपल्या जीवनात नवचैतन्य, समृद्धी आणि एकतेचा संदेश घेऊन येतो.या शुभदिनी,अमरावती शहर (जिल्हा) काँग्रेस भवन,नवीन इमारत शिवटेकडीच्या बाजुला,अमरावती येथे गुढी उभारणीचा भव्य आणि पवित्र सोहळा शहराध्यक्ष बबलु शेखावत यांच्या हस्ते गुढीची पूजा करून तसेच जिल्ह्याच्या माजी पालकमंत्री ड.यशोमती ठाकूर,माजी पालकमंत्री डॉ.सुनील देशमुख,माजी महापौर विलास इंगोले,महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी उपाध्यक्ष भैय्याजी पवार,महिला काँग्रेस अध्यक्षा जयश्री वानखडे यांच्या प्रमुख उपस्थिती मध्ये संपन्न झाला.हा कार्यक्रम केवळ नववर्षाचे स्वागतच नाही,तर काँग्रेस पक्षाच्या जनसेवेच्या अखंड परंपरेचा आणि समाजाप्रती असलेल्या अतूट बांधिलकीचा उत्सव आहे.काँग्रेस पक्ष हा नेहमीच देशाच्या प्रगतीचा आधारस्तंभ राहिला आहे.स्वातंत्र्य संग्रामापासून ते आजच्या आधुनिक भारताच्या उभारणीपर्यंत,काँग्रेस पक्षाने सामाजिक न्याय,समता आणि सर्वसमावेशक विकासाला चालना देत जनतेच्या हृदयात आपले स्थान निर्माण केले आहे. गरिबांचे आंसू पुसणे, शेतकर्यांना बळ देणे,तरुणांना संधी उपलब्ध करून देणे आणि प्रत्येक भारतीयाला सन्मानाने जगण्याचा हक्क मिळवून देणे, हे काँग्रेसचे ध्येय राहिले आहे.



गुढीपाडव्याच्या या मंगल प्रसंगी, काँग्रेस पक्ष पुन्हा एकदा जनतेच्या आशा-अपेक्षा पूर्ण करण्यासाठी आणि नव्या संकल्पांसह पुढे जाण्यासाठी कटिबद्ध आहे.नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकी मध्ये जे काही घडले हे सर्व विसरून आज ३० एप्रिल २०२५रोजी मराठी नववर्षाच्या शुभारंभ प्रसंगी म्हणजेच गुढीपाडव्या निमित्त अमरावती शहरातील जनतेच्या प्रत्येक समस्या सोडविण्याकरिता व शहरातील नागरिकांना नागरिकांचे हक्क मिळवून देण्याकरिता अमरावती शहर (जिल्हा) काँग्रेस कमिटी पुढाकार घेणार आहे.मागे घडलेले सर्व प्रसंग विसरून सर्व जुन्या गोष्टी मागे टाकून अमरावती शहरात काँग्रेस पक्ष एक नंबर वर आणु व महाराष्ट्रात देखील अमरावती उदाहरण घेऊन काँग्रेस पक्ष सर्वोच क्रमांकावर आणू याचा निर्धार यावर्षी गुढीपाडव्या निमित्त अमरावती शहर (जिल्हा) काँग्रेस कमिटी द्वारे करण्यात आला आहे.अमरावती शहर (जिल्हा) काँग्रेस पक्षा तर्फे समस्त अमरावतीकरांना मराठी नुतन वर्ष व गुढी पाडव्याच्या हार्दिक शुभेच्छा देत गुढी उभारू समृद्धीची,गुढी उभारु आनंदाची, गुढी उभारू सर्वधर्मसमभावाची काँग्रेस पक्षाच्या या प्रेरणादायी आणि जनकल्याणकारी कार्याला समस्त अमरावतीकरांच्या सहभागाने नवीन ऊर्जा मिळावी आणि नववर्षाच्या या नव्या सुरुवातीला एकता,प्रगती आणि समृद्धी लाभावी असा संकल्प करण्यात आला.याप्रसंगी प्रामुख्याने संजय वाघ,आनंदबाबू भमोरे,अभिनंदन प्रकाश वानखडे,अभिनंदन पेंढारी,दीपक हुंडीकर,किरण साऊरकर,सुरेश धावडे,समीर जवंजाळ,निलेश गुहे,वैभव देशमुख,सुजाता झाडे,शोभा रवींद्र शिंदे,शिल्पा राऊत,आरती पिंपळे,भैय्यासाहेब निचळ,सुनील पडोळे,पंकज मेश्राम,प्रभाकर वानखडे,अजयकुमार छटवाणी,विजय राठोड,गजानन जाधव,रणजीत इंगळे,पंकज मांडळे,विजय बर्वे,सचिन निकम,संजय मोरे,अरुण बनारसे,सौरभ तायडे,प्रा.अनिल देशमुख, शुभम अरुण बंबल, आशिष यादव,ओम कुबडे,श्रेयस धर्माळे यांचे सह अनेक मान्यवर उपस्थित होते.

# प्रवाशांना मिळणार थंडगार पाणी : कापुसतळणी बसस्थानकावर गाडगेबाबा पाणपोईचे उद्घाटन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१कापुसतळणी**

कापुसतळणी येथील बसस्थानकावर पक्षीमित्र अरुण शेवाणे यांच्यावतीने निष्काम कर्मयोगी गाडगेबाबा पाणपोई सुरू करण्यात आली. यामुळे प्रवाशांना आता थंडगार पाणी मिळणार आहे. कापुसतळणी येथे पंचक्रोशीतील मोलमजुरी करणारे लोकं साहित्य खरेदी करण्यासाठी येतात. त्यामुळे बसस्थानकावर मोठ्या प्रमाणात वर्दळ सुरू असते. उन्हाळ्याच्या दिवसात जीव लाहीलाही व्हायला लागतो. पशुपक्ष्यांसह मनुष्य सुद्धा थंड पाण्याच्या शोधात असतात. श्रीमंत लोक पाण्याची बाटली विकत घेऊन तहान भागवू शकतात, परंतु मोलमजुरी करणार्या गरीब लोकांना पाण्याची बाटली विकत घेणे शक्य नाही. अशा वर्दळीच्या ठिकाणी पाणपोई लावणे आवश्यक आहे. म्हणून पक्षीमित्र अरुण शेवाणे यांच्या लोकोपयोगी समाजसेवेतून गुढीपाडवा या हिंदू नववर्षाचे औचित्य साधून निष्काम कर्मयोगी गाडगेबाबा पाणपोई उभारण्यात आली. आमदार श्री. गजाननभाऊ लवटे यांचे शुभ हस्ते पाणपोईचे उद्घाटन करण्यात आले.

# अचलपूर शहरातील ऐतिहासिक शाही ईदगाहमध्ये ईद-उल-फित्र रमजान ईद शांततेत आणि उत्साहात संपन्न

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१अचलपूर**

अचलपूर शहरातील शाही ईदगाहमध्ये रमजान ईदच्या निमित्ताने रमजान ईदची नमाज शांततेत आणि उत्साहात संपन्न झाली. मुस्लिम समाजाने एकमेकांना रमजान ईदच्या शुभेच्छा दिल्या.

आज सोमवारी सकाळी दहा वाजता अचलपूर शहरातील शाही ईदगाहमध्ये रमजान ईदची नमाज शांततेत आणि उत्साहात अदा करण्यात आली. रमजान ईद निमित्ताने अचलपूर शहरातील मुस्लिम बांधवांनी एकत्र येऊन नमाज पठण केली. शाही ईदगाहमध्ये खतीब अफजल हुसेन यांनी नमाज अदा केली.

रमजान ईदची सुरुवात मशीद जामा येथून खतीब अफजल हुसेन, खतीब एजाज हुसेन आणि सगीर हुसेन यांच्या घरापासून करण्यात आली. यानंतर जुलूस पोलीस स्टेशन चौक, देवळी हिरापुरा गेट, पीर हाबस चौक आणि जोगीपुरा येथे शांततेत संपन्न झाला.

अचलपूरचे काजी सय्यद



गयास उद्दीन यांनी मुस्लिम समाजाला संबोधित केले आणि शांततेचा संदेश दिला. कार्यक्रमादरम्यान अचलपूर उपविभागीय पोलीस अधिकारी शुभम कुमार, अचलपूर पोलीस स्टेशनचे ठाणेदार म्हात्रे आणि गुप्तचर विभागाचे मोहन वावरे, अनिल झारेकर, डीबी एस्कॉर्टचे पिंटू बावणे, प्यारेलाल जामुनकर आणि सिद्धार्थ इंगळे यांनी कडक बंदोबस्त ठेवला होता. कार्यक्रमाला माजी राज्यमंत्री बच्चू कडू आणि काँग्रेस जिल्हा अध्यक्ष बबलू देशमुख यांनी देखील उपस्थित राहून मुस्लिम बांधवांना रमजान ईदच्या शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमादरम्यान अनेक मान्यवर आणि स्थानिक मुस्लिम बांधवांनी एकमेकांना शुभेच्छा देऊन ईद साजरी केली.

कार्यक्रमात पत्रकार फिरोज खान, मोहम्मद अझरुद्दीन, मोहम्मद इरशाद, तनवीर सर, अब्दुल कदीर सौदागर, जमील मास्टर, मतीन भाई ऑपरेटर, मस्तान कुरेशी, वसीम कुरेशी, एहतेश्याम, नबील, सय्यद सुलेमान, अब्दुल रहमान डॉक्टर, रफिक इंजिनियर, वहिद भाई, जमील सौदागर, अब्दुल मुनाफ, रफिक इंजिनियर, अब्दुल रौफ फ्रुट, मोहम्मद इक्बाल किराणा, तोफिक खान, राशिद भाई वकील, शौकत वकील साहेब, निसार खान चुस्ती, मसूद खान, इमरान शेजार यांच्यासह अनेक मुस्लिम नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जिल्ह्यात रमजान ईद साजरी; मुस्लिम बांधवांनी सामूहिक नमाज पठण करत केली प्रार्थना



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१ अमरावती**

मुस्लिम बांधवांचा पवित्र सण रमजान ईद निमित्ताने आज राज्यातील विविध शहरातील ईदगाह मैदान येथे मुस्लिम बांधवांतर्फे सामुहीक नमाज पठण करण्यात आले. अमरावती शहरांमध्ये हैदरपुरा भागातील ईदगाह मैदान येथे २५ हजार मुस्लिम बांधवांनी एकत्रित नमाज पठण करत देशात एकता व अखंडता टिकून रहावी; यासाठी प्रार्थना केली.मौलाना सईद अख्तर यांनी ही नमाज पठन केली.

मुस्लिम धर्मगुरूंनी अमरावती शहरातील सर्व हिंदू व मुस्लिम बांधवांना सणानिमित्त शुभेच्छा दिल्या. तसेच हिंदू व मुस्लिम बांधवांमधील एकता व अखंडता टिकून रहावी यासाठी प्रार्थना केली. नमाज पठण झाल्यानंतर मुस्लिम बांधवांनी एकमेकांना ईद मुबारक म्हणत गळेभेट घेत रमजान ईदच्या शुभेच्छा देखील दिल्या आहेत. यामध्ये चिमुकल्यांचा देखील सहभाग असल्याचे दिसून आले आहे.शहरातील ईदगाहवर सामुदायिक नमाज पठणानंतर सर्व पक्षीय नेतेमंडळींनी उपस्थित राहून गुलाब पुष्प देत मुस्लीम बांधवांचे स्वागत केले.

मुस्लिम बांधवांचा रमजान ईद हा सण सगळ्याच ठिकाणी व सर्वच जाती धर्माचे मान्यवर व देशातील नागरिक उत्साहाने सहभागी होवुन आनंदाने साजरा करतात.भाईचारा व मानवतेचा संदेश देणारा रमजान ईद सणाला जगतिक पातळीवर अत्यंत महत्व आहे. प्रेम, दया, शांती, समता, बंधुत्व,त्याग आणि सलोख्याचा संदेश देणाऱ्या 'रमजान ईद'च्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा!रमजान म्हणजे' बरकती' आणि ईद म्हणजे 'आनंद'.परस्परांमध्ये स्नेहभाव वाढविणारा हा महिना.हा महिना आणि हा दिवस मुस्लिम बांधवांसाठी अत्यंत पवित्र आणि मंगलमय मानला जातो.प्रेषित हजरत मोहम्मद पैगंबर यांनी आपल्या आचरणातून विश्वबंधुत्व व शांततेचा संदेश दिला आहे. या संदेशाचे स्मरण करावयाचे हे महान पर्व आहे.

# अमरावतीत ७२ आसनी विमानाची चाचणी यशस्वी

## आता प्रतीक्षा शुभारंभीय उड्डाणाची



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१अमरावती**

नव्यानेच तयार झालेल्या अमरावती विमानतळावर एटीआर-७२ विमानाची चाचणी रविवारी गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर घेण्यात आली आणि ती यशस्वी झाली. आता फक्त प्रतीक्षा उरली आहे ती शुभारंभीय उड्डाणाची!

अमरावती विमानतळ सुरू करण्याच्या दृष्टीने आवश्यक असलेल्या सर्व सुविधा आणि उपायोजना उभारण्याचे काम वेगाने सुरू आहे. सोबतच आवश्यक असलेल्या सर्व चाचण्या टप्प्याटप्प्याने घेण्यात येत आहे. त्यातलीच एक ७२ आसनी विमानाची अत्यंत महत्त्वाची व शेवटची चाचणी आज यशस्वीपणे घेण्यात आली. इंदोर वरून ७२ आसनी विमान अमरावतीच्या दिशेने झेपावले व विमानतळावर यशस्वीरित्या उतरले.या सर्व प्रक्रियेचे तज्ञ चमुने परीक्षण केल्यानंतर चाचणी यशस्वी झाल्याचे जाहीर करण्यात आले. या सर्व अहवालाचे परीक्षण झाल्यानंतर शुभारंभ उड्डाण्याची व विमानतळाच्या लोकार्पणाची तारीख जाहीर करण्यात येणार आहे. ९ एप्रिल रोजी पहिले उड्डाण होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. या संदर्भात अजून अधिकृत घोषणा झालेली नाही. अमरावतीतून विमान उडण्याचा महत्त्वाचा टप्पा पार पडल्यामुळे अमरावतीने नवा इतिहास रचला आहे. प्रादेशिक हवाई संपर्काच्या नव्या युगाची सुरुवात झाली. महाराष्ट्राच्या विमानतळ विकासाच्या दिशेने हा एक ऐतिहासिक टप्पा ठरला आहे.

**दोन्ही वैमानिक सादर करणार डीजीसीए, अलायन्सला अहवाल**

इंदूरहून बेलोरा विमानतळावर आलेले अलायन्स एअरलाइन्सच्या एटीआर-७२ या विमानाचे लँडिंग व टेकऑफ कसे राहिले. विमानतळावरील सर्व उपकरणे, यंत्रणा व्यवस्थित काम करत होत्या की नाही. व्यवस्थित संदेश वहन झाले की नाही. कोणत्या यंत्रणेने कशाप्रकारे प्रतिसाद दिला. याबाबत दोन्ही वैमानिक डीजीसीए तसेच अलायन्स एअरलाइन्सला अहवाल सादर करणार आहेत. दोन्ही अहवाल सकारात्मक राहतीलच, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. परंतु, त्यांनी काही सुधारणा सुचवल्या तर त्या करून त्यानंतरच अलायन्स एअरलाइन्स बेलोरा विमानतळावर सेटअप उभारेल. सेटअप पूर्ण झाल्यानंतरच ऑनलाइन प्रवासी तिकीट विक्री सुरू होईल, अशी माहिती विमानोड्डाण तज्ज्ञांनी दिली.

# अकोल्यात बायकोच्या छळाला कंटाळून तलाठ्याची आत्महत्या

## व्हॉट्सप स्टेटसवर म्हणाले- मृत्यूनंतर माझा चेहरा पत्नीला दाखवू नका

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१अकोला**

अकोला येथील तेल्हारा तहसील कार्यालयाच्या अंतर्गत तलाठी म्हणून कार्यकरत असलेले शिलानंद तेलगोटे यांनी रविवारी पत्नीच्या मानसिक छळाला कंटाळून आत्महत्या केली आहे. या घटनेने अकोला जिल्ह्यात एकच खळबळ उडाली आहे. शिलानंद तेलगोटे यांनी गळफास घेत आपले जीवन संपवले असल्याचे समोर आले आहे.



तलाठी शिलानंद तेलगोटे यांनी आत्महत्या करण्यापूर्वी व्हॉटसअपवर स्टेटस ठेवले होते. यात त्यांनी त्यांच्या आत्महत्येचे कारण स्पष्टपणे लिहिले आहे. आपली पत्नी आपला मानसिक छळ करत असल्याचे तसेच अश्लील शिव्या देत असल्याचे शिलानंद तेलगोटे यांनी स्पष्ट लिहिल्याचे दिसून आले आहे. तसेच माझ्या मृत्यूनंतर माझा चेहरा माझ्या पत्नीला दाखवू नये, असेहीह तेलगोटे यांनी स्टेटसमध्ये म्हटले आहे. पोलिसांनी शिलानंद तेलगोटे यांचा मृतदेह ताब्यात घेतला असून शवविच्छेदनासाठी तेल्हारा ग्रामीण रुग्णालयात पाठवण्यात आला आहे.

तलाठी शिलानंद तेलगोटे यांचा मृतदेह तेल्हारा ग्रामीण रुग्णालयात पाठवण्यात आला असून पुढील तपास शवविच्छेदानाच्या रीपोर्टवर अवलंबून असल्याचे पोलिसांनी सांगितले आहे. शिलानंद तेलगोटे यांनी आत्महत्या करण्यापूर्वी मृत्यूपत्र देखील तयार केले असल्याचे समोर आले आहे. यात त्यांनी आपली सर्व संपत्ती मुलाच्या नावावर केली असल्याचे समजते.

# विद्यार्थ्यांची अनुभवली खासदार मंत्रीसह 'हवाई सफर'

## सुखद अनुभव : जिल्हा परिषद विद्यार्थ्यांनी जाणला राजधानीचा ईतिहास

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१अमरावती**





तसे त्या २८ विद्यार्थ्यांचे वास्तव्य ग्रामीण भागातले...फार फार तर काहींनी बाजाराच्या व खरेदीच्या निमित्याने गावाची वेस ओलांडलेली...पण जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र यांच्या पुढाकाराने चौदा तालुक्यातील २८ विद्यार्थ्यांना दिल्लीची सफर घडली. यात देशातील राजधानी दिल्लीचा ईतिहास व सद्यस्थितीतील राजधानीतील धावपळ अनुभवाला मिळाली. विशेष म्हणजे परतीच्या विमान प्रवासात अमरावतीचे खासदार बळवंत वानखडे व माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांच्यासह हवाई सफरचा अनुभव मिळाला.

अमरावती जिल्हा परिषद अंतर्गत चौदा पंचायत समितीमधीलशिष्यवृत्ती परीक्षा, विविध स्पर्धा परीक्षा अंतर्गत यशस्वी विद्यार्थी, खेळाडू तसेच आदर्श शाळेतील प्रज्ञावंत विद्यार्थ्यांना जिल्हा परिषद अमरावती तर्फे सेस फंडातून दिल्ली हवाई सफरचे आयोजन करण्यात आले. यावेळी या दिल्ली सहल दरम्यान विद्यार्थ्यां सोबत व मार्गदर्शन करण्यासाठी डॉ. सुनीता लहाने(ढोक), भारती कासे, आशिष पांडे, वीरेंद्र ब्राम्हण आदींची निवड करण्यात आली. मेळघाट व ईतर विवीध तालुक्यातील काही विद्यार्थ्यांनी पहिल्यांदा गावाबाहेर पाऊल टाकले असल्याने हा प्रवास म्हणजे जीवनाचा नवा अनुभव होता. काही विद्यार्थ्यांनी रेल्वे पहिल्यांदा बघितली होती. पहिल्यांदा वातानुकूलित रेल्वे, हॉटेल प्रवास अनुभवाला मिळाला होता. ऐतिहासिक लाल किल्याची भव्यता, पी.एम.श्री केंद्रीय विद्यालयातील अष्टपैलू व्यक्तिमत्त्व घडविणारं शिक्षण, राष्ट्रपती भवनातील संग्रहालय, इंदिरा गांधी स्मृतीभवन, कुतुबमिनार, न गंजणारा पंचधातूचा लोहस्तंभ, आय.एन.एस.विक्रांत, मिग विमान यासह दिल्ली शहरातील धावपळ या विद्यार्थ्यांनी अनुभवली.

**शिक्षकांनी दाखविले पुस्तकाबाहेरील जग**

सहल प्रवास दरम्यान देशातील विविध राज्य, राजधानी, मोठी शहर, डोंगर, नदी व शहरे लागली. राजधानी म्हणून दिल्ली शहरच का ? रेल्वेच्या रुळात अंतर का ? रेल्वे ये जा करतांना रेल्वेची बाजू का बदलत नाही ? विमानाच्या खिडकी काचबंद का ? असे नानाविध प्रश्नोत्तरेद्वारे शिक्षकांनी विद्यार्थ्यांना आनंददायी वातावरणात खेळ व मनोरंजक पद्धतीतून पुस्तकंमुक्त व अनुभवजन्य शिक्षण दिलं.

आठवणीतील सहल :भर उन्हाळ्यात रेल्वे डब्ब्यातील गार गार प्रवास, प्लॅटफॉर्मवरील धावत्या पायऱ्या, आलिशान हॉटेल आणि त्यात टरबूज केकच्या माध्यमातून शिक्षकांनी साजरा केलेला माझा वाढदिवस. ही सहल म्हणजे माझ्या आयुष्यातील आठवणीतील सहल असल्याचे जिल्हा परिषद दहीगाव धावडे येथील विद्यार्थ्यांनी उन्नती सुरेश गवई (इयत्ता सहावी) हिने सांगितले.

**खासदार व मंत्रीसह सफर**

अनेकांना आयुष्यात साधे पंचायत समिती सभापती बघायला मिळत नाही. या सहलीच्या निमित्याने सहलीला हिरवी झेंडी दाखवायला मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र, शिक्षणाधिकारी डॉ.अरविंद मोहरे, उपशिक्षणाधिकारी बुद्धभूषण सोनोने हे होते. परतीच्या प्रवासात अमरावतीचे खासदार बळवंत वानखडे, माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांच्यासह गप्पा, सेल्फी तसेच हवाई सफर घडली. खासदार बळवंत वानखडे यांनी सुध्दा जिल्हा परिषदेच्या हवाई सफरचे अभिनंदन करत विद्यार्थ्यांशी दिलखुलास गप्पा मारत फोटोचा आनंद अनुभवला.

सहलीतील सहभागी विद्यार्थी :संस्कृती कडू, देवयानी देशमुख, पियूष हिवराळे,मयुरी बोरेकर, यासिर अहमद खान जावेद खान, उम्मी कुल्सूम मो.इम्रान, चंचल शिंदे, अर्णव मेहरे, शेख बिलाल शेख आरिफ, हमराज शेख मो अख्तर, उन्नती सुरेश गवई, मानस डुकरे, मयूर खडके, प्रज्वल तायडे, अदिती चव्हाण, आयुष कलदाते, देवश्री हराळे, प्राजक्ता तिरमारे, वैष्णवीजावरकर, सार्थक कंटाळे, लाईबा तस्निस मो.नौशाद, तन्मय बागेकर, आस्था वैद्य, अरहम सलीम मिर्झा, गुंजन आमले, एकता कोंडेकर, अनुष्का युवनाते, भाविका पाचरे आदी विद्यार्थ्यांचा या सहलीत समावेश होता.

# नागरवाडी आश्रमशाळेतील आदिवासी विद्यार्थ्यांनी खगोल दुर्बीणीतून अनुभवले आकाशदर्शन

## श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालयच्या वतीने आकाशदर्शनचे आयोजन



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१ चांदूरबाजार**

कर्मयोगी संत गाडगेबाबांचे अंतिम श्रध्दास्थान असलेल्या श्रीक्षेत्र नागरवाडी येथिल मेळघाट क्षेत्रातील गोरगरीब आदिवासी विद्यार्थ्यांच्या सार्वांगिण विकासाकरीता सातत्याने प्रयत्नशिल असलेल्या, श्री गाडगे महाराज आश्रमशाळा नागरवाडी येथे विद्यार्थ्यांसाठी खगोलशास्त्राचा परीचय,ताऱ्यांची ओळख,यासह दुर्बिणीतून ग्रहदर्शनाचा विशेष कार्यक्रम आयोजीत करण्यात आला होता.

यावेळी श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय येथिल भौतिक शास्त्र विभाग प्रमुख प्रा.डॉ.पंकज नागापुरे,कार्यक्रम समन्वयक प्रा.डॉ. राधिका देशमुख, डॉ.बोदडे, डॉ.स्वप्निल अडसड, डॉ.श्रध्दा बुटे,सुरज चिंचे आदिंचे संस्थेचे संचालक बापूसाहेब देशमुख यांनी स्नेहपुर्वक असे यथोचित स्वागत केले.

प्रामुख्याने मेळघाट क्षेत्रातील आदिवासी विद्यार्थ्यांना विज्ञानाविषयी कुतूहल निर्माण होवुन, अवकाशातील ग्रहताऱ्यांची त्यांना ओळय व्हावी या मुख्य हेतून चे यशस्वी आयोजन करत विद्यार्थ्यांना अवकाशातील विवीध ग्रहांची सविस्तर माहिती देवुन त्याचे थेट प्रक्षेपण टेलिस्कोपच्या माध्यमातून करण्यात आले.यावेळी आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांनी आकाशदर्शन मध्ये उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला.विशेषत: महाविद्यालयच्या भौतिकशास्त्र विभागाच्या माध्यमातून, आदिवासी बहुल क्षेत्रातील विद्यार्थ्यांकरीता प्रायोगिक कार्यशाळेतून आकाशदर्शन चा सुरु असलेला उपक्रम अत्यंत प्रशंसनीय असल्याचे संचालक बापूसाहेब देशमुख यावेळी बोलत होते.कार्यक्रमाच्या शेवटी माध्यमिक विभागाचे जेष्ठ शिक्षक गोपाल ढोरे यांनी कार्यशाळेच्या यशस्वी आयोजनाबद्ल अमरावती येथिल विज्ञान महाविद्यालयाचे प्राध्यापक वृंद यांचे विशेष आभार मानले. प्रामुख्याने या कार्यक्रमाला आश्रमशाळेचे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थ्यी, परीसरातील ग्रामस्त बहुसंस्खेने यावेळी उपस्थित होते.

# हिंदु भाविकांच्या ऑनलाईन लुटीची नवीन क्लृप्ती शेगाव, ओंकारेश्वरसह इतर भावीक लक्ष्य

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१नागपूर**

प्रत्येक धर्मिय नित्याने त्यांच्या धार्मिक स्थळी दर्शनाला जात असतात. हिंदु भाविकही मोठ्या संख्येने नियमित शेगावातील गजानन महाराज, ओंकारेश्वरसह इतरही भागात दर्शनासाठी जात असतात. या भाविकांची संख्या बघता त्यांना ऑनलाईन पद्धतीने लुटण्याची नवीन क्लृप्ती समाजकंटकांनी काढली आहे. त्यानुसार नागपुरातील वेलनकरसह इतरही काहींची फसवणूक झाली आहे. या क्लृप्तीबाबत आपण जाणून घेऊ या.

शेगावला रोज मोठ्या संख्येने देशाच्या वेगवेगळ्या भागातून भाविक जात असतात. या भाविकांसाठी संस्थानातर्फे मोठ्या प्रमाणात निवारा केंद्र उभारण्यात आले आहे. येथे माफक दरात भाविकांना थांबण्याची उत्तम व्यवस्था असते. तर माफक दरात भोजनसह इतरही सोय केली जाते. शेगाव, ओंकारेश्वरसह हिंदुच्या अनेक धार्मिक स्थळावर ही सोय करण्यात आली आहे. या धार्मिक स्थळाला रोज लक्षावधी भाविक दर्शनाला येत असतात. या भाविकांची संख्या बघता त्यांना लुटण्याची नवीन क्लृप्ती समाजकंटकांनी अंमलात आणली आहे. नागपुरातील काही भाविकांची यापद्धतीने फसवणूक झाल्याचा प्रकार समर्थ सद्गुरू श्री गजानन महाराज उपासना केंद्राचे जयंत वेलणकर यांनी पुढे आणला आहे.

वेलनकर यांचा पुतण्या पुणे येथे राहतो. त्याला शेगावला दर्शनासाठी जायचे होते. त्यामुळे त्याने संकेतस्थळाद्वारे तेथील निवाऱ्याची नोंदणीसाठी प्रयत्न सुरू केले. त्याला 'गजानन महाराज संस्थान त्र्यंबक' अशी वेबसाईट आढळली. त्यावर त्याने शेगावच्या निवाऱ्याच्या उद्देशाने ५ हजार रुपये भरले. त्यानंतर त्याला ही फसवे संकेतस्थळ असल्याचे निदर्शनात येऊन त्याची फसवणूक झाल्याचे निदर्शनात आले.

# शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालयाची माजी विद्यार्थ्यांची कार्यकारिणी जाहीर

## ५ एप्रिल ला होणार माजी विद्यार्थ्यांचा मेळावा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१अमरावती**







शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालयात १९८८ ते १९९५ व त्यानंतर हे जे विद्यार्थी शिकले त्या सर्व माजी विद्यार्थ्यांनी शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालयाचे प्राचार्य व तंत्र शिक्षण विभागाचे सहसंचालक डॉ.विजय मानकर यांच्या मार्गदर्शनात माजी विद्यार्थ्यांची कार्यकारिणी गठित केलेली आहे.

या महाविद्यालयाचे काही विद्यार्थी विदेशात तर काही पुने, मुंबई, बेंगलोर येथे मल्टिनॅशनल कंपन्यांमध्ये उच्च पदावर तर काहींनी आपले मोठे मोठे उद्योग व्यवसाय उभारलेले आहे. ज्या महाविद्यालयाने घडविले त्या महाविद्यालयाप्रती ऋण फेडण्यासाठी तसेच या महाविद्यालयात सध्या शिकत असलेल्या होतकरु व गरीब विद्यार्थ्यांच्या शिक्षणास हातभार,त्यांना मदत करण्यासाठी ही कार्यकारिणी गठीत करण्यात आलेली आहे. या माजी विद्यार्थ्यांच्या कार्यकारिणीमध्ये सर्वानुमते अध्यक्षपदी एस पी वानखडे, सचिव मिलिंद आंबटकर, उपाध्यक्ष संजय बालपांडे, सहसचिव राहुल मोरे, कोषाध्यक्ष प्रा.निशांत भोरे,तर कार्यकारिणी सदस्यांमध्ये अनिल पमनानि, प्रवीण रेवतकर, जयंत तायवाडे धर्मेंद्र सोनी, उमेश गावंडे,संजय शेंडे, शशिकांत रोडे, रुपेश टेंभुर्णे,रवी भुतडा,प्रकाश नंदनवार, डॉक्टर राहुल उंबरकर, प्रोफे प्रमोद पाटील,अपर्णा राठोड,,दुर्गा पंचगाव, वंदना जोशी, यांचा समावेश आहे.केवळ महाराष्ट्रातूनच नव्हे तर देशाच्या कानाकोपऱ्यातून व विदेशातून देखील हे माजी विद्यार्थी ५ एप्रिल रोजी शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालय गाडगे नगर येथे सर्व माजी विद्यार्थी मेळाव्यासाठी उपस्थित राहणार आहेत.